"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"

- शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur**

# Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

# LIBRARY

## Newspaper Clippings

## 2022-23 – PART 3

साप्ताहिक इचलकरंजी समाचार • गुरुवार १५-१२-२०२२ •

# अविष्कार स्पर्धेत डी.के.एस.सी.कॉलेजचे यश


## सिमरन मुजावर तृतीय पारितोषिकाने सन्मानीत



इचलकरंजी–शिवाजी विद्यापीठ मार्फत आयोजित विद्यापीठ आविष्कार स्पर्धेत मध्ये डीकेएएससी कॉलेजची विद्यार्थीनी सिमरन सरदार मुजावर बीएससी-३ रसायनशास्त्र हिला प्युअर सायन्स या विभागातून शेती कचऱ्यापासून सिलिका निष्कर्षण या प्रयोगाला तृतीय पारितोषिक मिळाले.

यासाठी प्राचार्य डॉक्टर अनिल पाटील, समन्वयक डॉक्टर दीपक कुंभार, प्रा.स्वीटी फडतरे, व रिसर्च प्रमोशन अँड मॉनिटरिंग कमिटीचे सदस्य गुरुदेव कार्यकर्ते यांचे सहकार्य लाभले.

CS Scanned with CamScanner



सकाळ
शुक्रवार, १६ डिसेंबर २०२२

## 'कदम कॉलेज'मध्ये भारती यांची जयंती

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज येथे थोर साहित्यिक चिन्नास्वामी सुब्रमण्यम भारती यांची जयंती भारतीय भाषा दिवस म्हणून साजरी केली. प्रमुख पाहुणे प्रा. सुधाकर इंडी म्हणाले, 'भाषा ही आपल्या जगण्याचा भाग आहे. इतकेच नव्हे तर भाषा ही रोजगाराचे साधन म्हणून तिचे महत्त्व आज नव्याने अधोरेखित होत आहे.' प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. डॉ. डी. सी. कांबळे होते. उपप्राचार्य प्रा. डी. ए. यादव, डॉ. डी. जी. घोडके, प्रा. व्ही. पी. पाटील, प्रा. अरुण कटकोळे उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ
शनिवार,
१७ डिसेंबर २०२२



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात कायदे विषयावर भित्तीपत्रिका प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव आदी.

## 'डीकेएएससी'मध्ये भित्तीपत्रिका प्रदर्शन

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात कायदे विषयावर भित्तीपत्रिका प्रदर्शन भरविण्यात आले. कायदे व त्यांचे नियमन विषयावरील भित्तीपत्रिका बी.कॉम. भाग तीनच्या विद्यार्थ्यांनी सादर केली. विघ्नेश जोशी, उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव यांनी उद्घाटन केले. भित्तीपत्रिकेत बौद्धिक संपादन हक्क, कर्मचारी विमा कायदा, भारतीय दंडसंहिता, वस्तू व सेवा कर, हरित लवाद, पेटंट व कॉपीराईट कायदा, सायबर गुन्हे, आयात-निर्यात कायदा, कर्मचारी भविष्यनिर्वाह निधी कायदा, मोटार वाहन कायदा, पोक्सो व लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा आदी विषयांवर विद्यार्थ्यांनी पोस्टरद्वारे माहितीचे सादरीकरण केले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत
मंगळवार, २० डिसेंबर २०२२



इचलकरंजी : डीकेएएससीमध्ये समान संधी केंद्राद्वारे विद्यार्थ्यांना समुदेशन करताना मार्गदर्शक.

# डीकेएएससीमध्ये समान संधी केंद्राद्वारे विद्यार्थ्यांना समुपदेशन

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या विविध स्कॉलरशिप, फ्रीशिप योजना तसेच कौशल्य विकासाची मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजावीत, या हेतूने समुपदेशन कार्यक्रम झाला. विद्यार्थ्यांमध्ये स्वयंरोजगार, उद्योग, व्यवसाय व सेवा पुरवठा यांची रुची निर्माण व्हावी, त्यांच्यातील कौशल्यांचा विकास व्हावा, या हेतूने समान संधी केंद्राच्यावतीने मार्गदर्शन करण्यात आले. विविध शिष्यवृतीच्या योजना, त्यासाठीचे आवश्यक कागदपत्रे, कालावधी, पोर्टलद्वारे भरावयाची माहीती इ. संदर्भात माहिती देण्यात आली. याबाबत विद्यार्थ्यांनी समयसूचकता पाळून सकारात्मक प्रतिसाद दिला पाहिजे, असे मत डॉ. डी. सी. कांबळे यांनी व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. विजय पाटील यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते. आभार प्रा. ए. एस. कटकोळे यांनी मानले. शिक्षकेतर कर्मचारी एस. पी. वृष्टे यांचे सहकार्य लाभले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ
शुक्रवार,
२३ डिसेंबर २०२२




इचलकरंजी : समान संधी केंद्र अंतर्गत आयोजित कार्यक्रमात बोलताना उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे.

## 'डीकेएएससी'मध्ये विद्यार्थ्यांना समुपदेशन

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात समान संधी केंद्रांतर्गत विद्यार्थ्यांना समुपदेशन केले. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती, मोफत शिक्षण योजना, कौशल्य विकासाची मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजावीत या हेतूने हा कार्यक्रम घेतला. शिष्यवृत्तीच्या योजना त्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे, कालावधी, पोर्टल आदींबाबत प्रा. डॉ. घोडके यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी समयसुचकता पाळून मिळणाऱ्या लाभांसाठी सकारात्मक प्रतिसाद दिला पाहिजे, असे मत उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे यांनी व्यक्त केले. प्रा. विजय पाटील यांनी प्रास्ताविक केले. आभार प्रा. ए. एस. कटकोळे यांनी मानले.

CS Scanned with CamScanner

सकाळ सोमवार, २६ डिसेंबर २०२२

# दत्ताजीराव कदम महाविद्यालयात सेट-नेटबाबत मार्गदर्शन

**इचलकरंजी, ता. २५ :** येथील दत्ताजीराव कदम आर्टस् सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या हिंदी विभागातर्फे सेट-नेट परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रम झाला. प्रा. डॉ. विकास पाटील म्हणाले, 'सेट-नेट परीक्षा देत असताना विद्यार्थ्यांनी जिद, चिकाटी, मेहनत आणि अभ्यासातील सातत्य राखणे आवश्यक आहे; त्याचप्रमाणे प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, गुण विभाजन, अभ्यासक्रम, पेपर सोडवताना वेळेचे नियोजन, भाषा ज्ञान या सर्व गोष्टी जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.' प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या मार्गशनाखाली हा कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. डी. सी. कांबळे होते. स्वागत आणि प्रास्ताविक हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. अंजली उबाळे यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रा. अर्चना तराळ यांनी करून दिली.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत मंगळवार २७ डिसेंबर २०२२

# अभय चषक क्रिकेट स्पर्धेचा डीकेएएससी कॉलेज मानकरी

प्रतिनिधी
इचलकरंजी

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या महाराष्ट्रातील सर्व शाखेतील प्राध्यापक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्यासाठी संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या वाढदिवसानिमित्त अभय चषक – २०२३ टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. ही स्पर्धा पंधरा दिवस कोल्हापूर येथे सुरु होती. स्पर्धेमध्ये कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील संस्थेच्या विविध शाखांमधून क्रिकेट संघ सहभागी झाले होते. यातून इचलकरंजी येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्या क्रिकेट संघाने उपांत्य सामन्यात विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर आणि अंतिम सामन्यात डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीरिंग अँड टेक्नॉलॉजी, कोल्हापूर या संघांचा पराभव करून अभय चषक पटकावत महाविद्यालय व इचलकरंजीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या संघासाठी मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे, मा. प्राचार्या शुभांगी गावडे, कौस्तुभ गावडे व प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. ही स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी पुढाकार घेतला.

संघातर्फे खेळाडू मुजफ्फर लगीवाले, प्रशांत कांबळे, विजय सूर्यवंशी, अर्जुन कोकरे, अक्षय स्वामी, अवधूत ढोकरे, संजय पाटील, जुबेर खतीब, चेतन पाटील, रघुनाथ शिरढोणे, जयकुमार करके, रविकिरण मेटी, ऋषीराज माने, प्रतीक कदम, प्रा. मेजर मोहन विरकर, अधीक्षक सुनील महाडिक व संदीप करडिले यांचा सहभाग होता. कनिष्ठ महाविद्यालयाचे इनचार्ज एम. बी. पाटील, मुख्य लिपिक प्रकाश कुराडे, महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांनी संघाचे अभिनंदन केले.



इचलकरंजी : अभय चषक क्रिकेट विजेता डीकेएएससी कॉलेजचा संघ

Scanned with CamScanner

# डी.के.ए.एस.सी. कॉलेजने पटकावला अभय चषक

**इचलकरंजी/महानकार्य वृत्तसेवा**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या महाराष्ट्रातील सर्व शाखेतील प्राध्यापक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्यासाठी संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या वाढदिवसानिमित्त अभय चषक - २०२३ या भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा गेली पंधरा दिवस कोल्हापूर येथे सुरु होती. या स्पर्धेमध्ये कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यातील संस्थेच्या विविध शाखांमधून क्रिकेट संघ सहभागी झाले होते. यातून इचलकरंजी येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्या



क्रिकेट संघाने उपांत्य सामन्यात विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर आणि अंतिम सामन्यात डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीरिंग अँड टेक्नॉलॉजी, कोल्हापूर या संघांचा पराभव करून अभय चषक पटकावत महाविद्यालय व इचलकरंजीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या संघासाठी मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे, मा. प्राचार्या शुभांगी गावडे मॅडम, मा. श्री. कौस्तुभ गावडे व प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. ही स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. कौस्तुभ गावडे यांनी पुढाकार घेतला.

संघातर्फे खेळाडू मुजफ्फर लगीवाले, प्रशांत कांबळे, विजय सूर्यवंशी, अर्जुन कोकरे, अक्षय स्वामी, अवधूत ढोकरे, संजय पाटील, जुबेर खतीब, चेतन पाटील, रघुनाथ शिरढोणे, जयकुमार करके, रविकिरण मेटी, ऋषीराज माने, प्रतीक कदम, प्राध्यापक मेजर मोहन विरकर, अधीक्षक सुनील महाडिक व संदीप करडिले यांचा सहभाग होता. कनिष्ठ महाविद्यालयाचे इनचार्ज श्री. एम. बी. पाटील, मुख्य लिपिक श्री. प्रकाश कुराडे, महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांनी संघाचे अभिनंदन केले.

सकाळ
बुधवार,
२८ डिसेंबर २०२२



इचलकरंजी : अभय चषक क्रिकेट स्पर्धेतील विजेता दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजचा संघ.

# अभय चषक क्रिकेट स्पर्धेत डीकेएएससी कॉलेज विजयी

इचलकरंजी, ता. २७ : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतर्फे आयोजित अभय चषक या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्या क्रिकेट संघ विजेता ठरला. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या वाढदिवसानिमित्त स्पर्धेचे आयोजन केले होते.

दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्या क्रिकेट संघाने उपांत्य सामन्यात विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर संघाला पराभूत करत अंतिम सामन्यात धडक मारली. अंतिम सामन्यात डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीरिंग, कोल्हापूर या संघांचा पराभव करून अभय चषक पटकावला. या संघासाठी प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे, कौस्तुभ गावडे व प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. संघात प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रशांत कांबळे, विजय सूर्यवंशी, अर्जुन कोकरे, अक्षय स्वामी, अवधूत ढोकरे, संजय पाटील, जुबेर खतीब, चेतन पाटील, रघुनाथ शिरढोणे, जयकुमार करके, रविकिरण मेटी, ऋषीराज माने, प्रतीक कदम, प्रा. मेजर मोहन विरकर, अधीक्षक सुनील महाडिक व संदीप करडिले यांचा सहभाग होता.

CS Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, बुधवार, ४ जानेवारी २०२३

# सावित्रीबाई फुले जयंती;

**डीकेएएससी महाविद्यालय**

प्रतिमा पूजन प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले. डॉ. एस. जे. वेल्हाळ यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन वृत्तांत व कार्याची माहिती दिली. डॉ. डी. सी. कांबळे, डॉ. घोडके, प्रा. डी. ए. यादव आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, शुक्रवार, १३ जानेवारी २०२३



**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयामध्ये अग्निवीर निवड व खेळाडूंच्या सत्कारप्रसंगी सुरेश हाळवणकर, प्राचार्य डॉ. अनिल पाटील.

# एएससी महाविद्यालयात अग्निवीर, खेळाडूंचा सत्कार

## सुरेश हाळवणकर यांची उपस्थिती

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. १२ : दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयातील अग्निवीर म्हणून निवड झालेल्या, तसेच यशस्वी खेळाडूंचा सत्कार केला. महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य माजी आमदार सुरेश हाळवणकर यांच्या हस्ते करण्यात आला.

महाविद्यालयातील चार एनसीसी कॅडेट सुशांत केणे, प्रवीण फुंडे, गुड्डी सिंग यांची भारतीय सैन्य दलात अग्निवीर म्हणून निवड झाली आहे. योगा खेळाडू सानिका जाधव, मनम कासलीवाल, समीर सनगर यांनी राष्ट्रीय स्पर्धेत राज्य संघाचे नेतृत्व केले. प्रतिज्ञा अडसूळ, समीक्षा अडसूळ, सौरभ दौडकते, पुष्कर पाटील यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

मिनी ऑलिम्पिक स्पर्धेत कौस्तुभ पोवार्डे, करण घुणके, पवन कोळी, ओंकार देवतकर, प्रियांका चव्हाण, पायल वाघमोडे, अर्पिता गड्डे यांनी सुवर्णपदक मिळवले. त्यांचा सत्कार माजी आमदार हाळवणकर यांच्या हस्ते केला. प्रा. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डॉ. डी. ए. यादव, प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. डॉ. अर्जुन जाधव आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत शनिवार, १४ जानेवारी २०२३



इचलकरंजी : दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयांमध्ये अग्निवीर निवड व खेळाडूंचा माजी आमदार सुरेश हाळवणकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# डीकेएएससीमध्ये अग्निवीर निवड झालेल्यांचा सत्कार

प्रतिनिधी
इचलकरंजी

भारतीय सैन्य दलात अग्निवीर म्हणून निवड झालेल्या एनसीसी कॅडेट आणि विविध राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत यश मिळवलेल्या दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयातील खेळाडूंचा सत्कार आणि प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचा सत्कार महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य माजी आमदार सुरेश हळवणकर यांच्या हस्ते करण्यात आला.

महाविद्यालयातील चार एनसीसी कॅडेट सुशांत केणे, प्रवीण फुंडे, गुड्डी सिंग यांची भारतीय सैन्य दलात अग्निवीर म्हणून निवड झाली आहे तसेच योगा खेळाडू सानिका जाधव, मनम कासलीवाल, समीर सनगर राज्यासाठी निवड झालेले प्रतिक्षा अडसूळ, समीक्षा अडसूळ, सौरभ दौंडवते, पुष्कर पाटील मिनी ओलंपिक स्पर्धेत सुवर्णपदक मिळवलेले कौस्तुभ पोकार्डे, करण घुणके, पवन कोळी, ओंकार देवताकर, प्रियांका चव्हाण, पायल यामगोडे, अर्पिता गड्डे आदींचा सत्कार आमदार सुरेश वाडकर यांच्या हस्ते करण्यात आला.

माजी आमदार सुरेश हळवणकर यांच्या हस्ते प्राचार्य अनिल पाटील यांचा सत्कार करण्यात आला. माजी आमदार सुरेश हाळवणकर यांनी मुलांचे कौतुक केले. मेडल मिळवलेल्या खेळाडूंना स्वतःच्या पायावर अग्निवीरांसारखे उभे राहण्याचे आवाहन केले. महाविद्यालयासाठी आवश्यक सहकार्य करण्याचे अभिवचन त्यांनी दिले.

यावेळी प्रा. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डॉ. डी. ए. यादव, प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. डॉ. अर्जुन जाधव, प्रा. विजय पाटील, प्रा. रोहित शिंगे उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र केसरी १६ जानेवारी २०२३




दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये बोलताना श्रीकांत प्रभुदेसाई.

# डी.के.ए.एस.सीमध्ये स्वामी विवेकानंद जयंती

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये श्री स्वामी विवेकानंद जयंती सप्ताह उद्घाटन व राजमाता जिजाऊ आऊसाहेब यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रमुख पाहुणे रामकृष्ण सत्संग मंडळाचे उपाध्यक्ष श्रीकांत प्रभुदेसाई यांनी संघर्ष नको शांतता हवी या स्वामीजींच्या विचारांची आज जगाला नितांत गरज आहे. राजमाता जिजाऊंनी स्वराज्याची अस्मिता शिवबांच्या व्यक्तिमत्त्व उभारणीतून जागवली, तर स्वामी विवेकानंदांनी पारतंत्र्यात स्वत्व हरवलेल्या भारतीयांना जाग आणली असे सांगितले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी संस्थेची माहिती दिली. प्रा. संजय सुतार यांनी प्रास्ताविक केले, स्वागत प्रा. डी. ए. यादव यांनी केले. आभार डॉ. डी. सी. कांबळे यांनी मानले

Scanned with CamScanner

# डी.के.ए.एस.सी.मध्ये हिंदी दिवस साजरा

**इचलकरंजी** : दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या हिंदी विभागाने हिंदी दिवस उत्साहात साजरा केला. डी. के. ए. एस. सी. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी डॉ. बापूजी साळुंखे विद्यालयामध्ये इयत्ता ५ वी ते ९ वीच्या वर्गांमध्ये हिंदी विषयाचे अध्यापन केले. हिंदी भाषेच्या प्रसार-प्रचारामध्ये आपले योगदान दिले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संयोजन डॉ.अंजली उबाळे , प्रा. अर्चना तराळ प्रा. अपर्णा कांबळे यांनी केले.

केसरी

9921600800

16-1-2023

लोकमत, सोमवार, दि. १६ जानेवारी २०२३

# विश्व हिंदी दिवस साजरा

इचलकरंजी : येथील डीकेएएससी महाविद्यालयात विश्व हिंदी दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या हिंदी विभागातील विद्यार्थ्यांनी डॉ. बापूजी साळुंखे विद्यालयामध्ये जाऊन तेथील इयत्ता पाचवी ते नववीच्या वर्गामध्ये हिंदी विषयाचे अध्यापन केले. यासाठी प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. अंजली उबाळे, अर्चना तराळ, अपर्णा कांबळे, किशोरी टोणपे यांनी संयोजन केले होते.

Scanned with CamScanner

सकाळ, मंगळवार, १७ जानेवारी २०२३

# ‘डीकेएएससी’मध्ये उद्या कार्यक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. १६ : दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयात ‘निंभार’ कादंबरीवर आधारित कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. हा कार्यक्रम बुधवारी (ता. १८) सकाळी नऊ वाजता डीकेएएससी कॉलेज येथे होणार आहे. ही माहिती मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. संजय सुतार यांनी पत्रकार बैठकीत दिली.

प्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक डॉ. रवींद्र ठाकूर हे ‘निंभार’ कादंबरीवर स्वागतभाष्य करणार आहेत. कवी अरुण म्हात्रे, लेखक व कवी महेश केळुसकर (ठाणे), शशिकांत तिरोडकर (पुणे) यांची प्रमुख उपस्थिती आहे. स्वामी विवेकानंद जयंती सप्ताह आणि मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे औचित्य साधून मराठी विभाग व वाङ्मय मंडळाने विद्यार्थी आणि साहित्यिकांसाठी या अनोख्या कार्यक्रमाचे नियोजन केले आहे. संतोष तेंडुलकर लिखित या ‘निंभार’ कादंबरीचे प्रकाशनही कार्यक्रमात होणार आहे. यानंतर प्रसिद्ध कवी व स्थानिक कवींचे कविसंमेलन होणार आहे. कार्यक्रमाचे प्रमुख निमंत्रक प्राचार्य डॉ. अनिल पाटील असल्याचे सांगितले. उपप्राचार्य प्रा. डी. ए. यादव, डॉ. डी. सी. कांबळे, मेजर मोहन वीरकर, लेखक संतोष तेंडुलकर आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner



इचलकरंजी : दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयातील खेळाडूंचा सत्कार माजी आमदार सुरेश हळवणकर यांच्या हस्ते करण्यात आला.

# दत्ताजीराव कदम महाविद्यालयामध्ये अग्नीवीर आणि खेळाडूंचा सत्कार

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** भारतीय सैन्य दलात अग्नीवीर म्हणून निवड झालेल्या एनसीसी कॅडेट आणि विविध राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत यश मिळवलेल्या दत्ताजीराव कदम ए.एस.सी महाविद्यालयातील खेळाडूंचा आणि प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचा सत्कार महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य माजी आमदार सुरेश हळवणकर यांच्या हस्ते करण्यात आला. महाविद्यालयातील चार एनसीसी कॅडेट सुशांत केणे, प्रवीण फुंडे, गुड्डी सिंग यांची भारतीय सैन्य दलात अग्नीवीर म्हणून निवड झाली आहे तसेच योगा खेळाडू सानिका जाधव, मनम कासलीवाल, समीर सनगर राज्यासाठी निवड झालेले प्रतिज्ञा अडसूळ, समीक्षा अडसूळ, सौरभ दौडवते, पुष्कर पाटील मिनी ऑलंपिक स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले. कौस्तुभ पोकार्डे, करण घुणके, पवन कोळी, ओंकार देवतकर, प्रियांका चव्हाण, पायल वाघमोडे, अर्पिता गड्डे आदींचा सत्कार आमदार सुरेश वाडकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, डॉ. डी. ए. यादव, प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. प्रशांत कांबळे, डॉ. अर्जुन जाधव उपस्थित होते.

केसरी

9921600800

17-1-2023

सकाळ
गुरुवार, १९ जानेवारी २०२३

# 'डीकेएएससी'मध्ये हिंदी दिवस

इचलकरंजी, ता. १८ : डीकेएएससी महाविद्यालयात विश्व हिंदी दिवस कार्यक्रम उत्साहात साजरा झाला. हिंदी विभागातील विद्यार्थ्यांनी डॉ. बापूजी साळुंखे विद्यालयात जाऊन तेथील पाचवी ते नववीच्या वर्गामध्ये हिंदी विषयाचे अध्यापन केले.

विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेवरचे प्रेम व्यक्त करत हिंदी भाषेच्या प्रसार-प्रचारामध्ये मोलाचे योगदान दिले. या अनोख्या पद्धतीने साजरा केलेल्या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. यासाठी डॉ. बापूजी साळुंखे शाळेचे मुख्याध्यापक पाटील यांचे सहकार्य मिळाले. संयोजन हिंदी विभागाच्या प्रा. डॉ.अंजली उबाळे, प्रा.अर्चना तराळ, प्रा.अपर्णा कांबळे प्रा. किशोरी टोणपे यांनी केले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत शुक्रवार, २० जानेवारी २०२३

# डीकेएएससीमध्ये ज्ञानशिदोरी दिन

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये ग्रंथालय, सांस्कृतिक व वाङ्मय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने श्री स्वामी विवेकानंद जयंती सप्ताह, मराठी भाषा संवर्धन पंधरवडा आणि संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा वाढदिवस ज्ञानशिदोरी दिन म्हणून उत्साहात झाला. यावेळी प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ | शनिवार, २१ जानेवारी २०२३



इचलकरंजी : नाईट कॉलेज येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. अतिष पाटील. व्यासपीठावर मान्यवर.

## नाईट कॉलेजमध्ये व्याख्यान

इचलकरंजी : भूगोल शास्त्रात काळानुरूप नवनवीन अभ्यासघटक समाविष्ट होत आहे. या विषयाची व्याप्ती अधिकाधिक व्यापक होत असल्यामुळे या विषयात रोजगाराच्या व्यापक संधी उपलब्ध असून, विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेण्याची गरज आहे, असे प्रतिपादन डॉ. अतिष पाटील यांनी केले. नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स येथे भूगोल विभाग, रोटरॅक्ट क्लब व विवेक वाहिनी विभागातर्फे भूगोल दिनानिमित्त आयोजित 'भूगोल विषयातील संधी व आव्हाने' याविषयावर ते बोलत होते. प्राचार्य डॉ. पी. डी. नारे अध्यक्षस्थानी होते. प्रा. डॉ. रविकिरण कोरे यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. डॉ. प्रवीण पवार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. केशवकुमार माने यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. एफ. एन. पटेल यांनी केले.

Scanned with CamScanner

सकाळ | शनिवार, २१ जानेवारी २०२३

# साहित्य माणसाच्या जगण्याचा दस्तऐवज

## कवी अरुण म्हात्रे : डीकेएएससी महाविद्यालयात कार्यक्रम

इचलकरंजी, ता. २० : साहित्य जिवंत माणसाच्या जगण्याचा दस्तऐवज आहे. साहित्यकृतीमधील जगण्याची अस्सल सल वाचकाच्या अंतरंगात उतरते तेव्हा ती जनमानसात रुजत जाते. 'निंभार' ही अशीच कादंबरी असून भर उन्हात शीतल चांदणं शोधण्याचा प्रत्यय देणारी कृती आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे यांनी केले.

येथील डीकेएएससी महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उपक्रमांतर्गत वाङ्मय मंडळ आयोजीत संतोष तेंडुलकर लिखित "निंभार" कादंबरीचा प्रकाशन आणि स्वागतभाष्य कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात कादंबरी प्रकाशन आणि स्वागतभाष्य कार्यक्रमात बोलताना कवी अरुण म्हात्रे. व्यासपीठावर मान्यवर.

कादंबरीवर स्वागतभाष्य करताना समीक्षक डॉ. रवींद्र ठाकूर म्हणाले, 'बोलणं ही माणसाची अभिव्यक्ती आहे तर लिहिणं ही लेखकाची अभिव्यक्ती आहे. कोणतेही साहित्य वाचनासाठी लिहिले जाते, अशी वाचनीय कादंबरी म्हणून 'निंभार' उत्तम नमुना आहे.' अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे विश्वस्त राजन मुठाणे यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी स्वागत केले. "निंभार" कादंबरीचे लेखक संतोष तेंडुलकर व त्यांचे कुटुंबीय आणि दादासाहेब जगदाळे यांचा सत्कार केला. प्रास्ताविक प्रा. संजय सुतार यांनी केले.

### कविसंमेलन लक्षवेधी

- निमंत्रितांचे 'कविसंमेलन' लक्षवेधी ठरले. त्यात कवी अरुण म्हात्रे, महेश केळुसकर, शशिकांत तिरोडकर, दिलीप सावंत, रवींद्र ठाकूर, पाटलोबा पाटील, प्रकाश काशीद, वैशाली नायकवडे, वसंत पाटील, रोहित शिंगे व प्रियांका भाटले यांच्या कवितांना श्रोत्यांकडून उस्फूर्त दाद मिळाली.

Scanned with CamScanner

तरुण भारत २१ जानेवारी २०२३

# डीकेएएससीच्या सुयश चव्हाण याची दिल्ली परेडसाठी निवड

**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयातील सुयश चव्हाण याची २६ जानेवारी रोजी होणाऱ्या दिल्ली राजपथावर संचलनासाठी



निवड झाली आहे. कोल्हापूर, पुणे आणि दिल्ली येथील एकूण ९० दिवसांच्या कठोर आर. डी परेड कॅम्पमधून निवड झाली आहे. तो एएससी महाविद्यालयातील बीसीए मध्ये शिकत आहे. त्याने एनसीसीमध्ये भरती झाल्यापासून आर डी परेड दिल्ली करणार असे स्वप्न बाळगले होते. त्याची त्या आर डी परेडच्या दिशेने प्रा. मेजर मोहन विरकर यांनी तयारी करून घेतली होती. एएससी महाविद्यालयाची बारा वर्षाची परंपरा त्याने पुढेही चालू ठेवले आहे. २०१२ पासून एएससी कॉलेजचा एनसीसी कॅडेट दरवर्षी दिल्ली परेडसाठी जात आहे. अशा प्रकारचे यश मिळवणारे एएससी महाविंद्यालय महाराष्ट्रातील एकमेव महाविद्यालय आहे. त्याला प्राचार्य डॉ. अनिल पाटील, ५६ महाराष्ट्र बटालियनचे कर्नल वैजयंत थोरात, प्रा. मेजर मोहन विरकर, सुभेदार सुरेश अडसुळे, कैलास साबळे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रशांत कांबळे, प्राध्यापक, कर्मचारी यांनी त्याचे अभिनंदन केले.

CS Scanned with CamScanner




# ‘निंभार‘ कादंबरीचे प्रकाशन

**इचलकरंजी /महान कार्य वृत्तसेवा**

येथील ए.एस.सी. महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उपक्रमांतर्गत संतोष तेंडूलकर लिखीत ‘निंभार’ कादंबरीचा प्रकाशन सोहळा पार पडला. यावेळी प्रसिध्द कवी अरूण म्हात्रे म्हणाले, बोलणं ही माणसाची अभिव्यक्ती आहे तर लिहिणं ही लेखकाची अभिव्यक्ती आहे. साहित्य हे वाचनासाठी असतं. निंभार वाचनीय कादंबरीचा उत्तम नमुना आहे.

यावेळी डॉ. अनिल पाटील, रविंद्र ठाकूर, शशिकांत तिरोडकर, दिलीप सावंत, महेश केळूस्कर, राजन मुठाणे, पाटलोबा पाटील, प्रकाश काशिद, वैशाली नाईकवडे, वसंत पाटील, रोहित शिंगे, प्रियांका भाटले यांनी सादर केलेल्या कवितांना दाद मिळाली. संजय सुतार, डॉ. ज्ञानेश्वर कांबळे, प्रा. भारती कोळेकर, प्रा. अशोक दास, इब्राहिम मिरजे, प्रसाद कुलकर्णी, सुषमा दातार, माया कुलकर्णी यांच्यासह मान्यवर आणि विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ | रविवार, २२ जानेवारी २०२३

# 'डीकेएएससी'मध्ये ज्ञानशिदोरी दिन

**इचलकरंजी, ता. २१ :** डीकेएएससी महाविद्यालयात ज्ञानशिदोरी दिन झाला. विवेकानंद जयंती सप्ताह, मराठी भाषा संवर्धन पंधरवडा, संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून हा दिन झाला.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. प्रास्ताविक अमित कोवे यांनी केले. सानिका शेट्टी यांनी मनोगत व्यक्त केले. उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, प्रा. व्ही. पी. पाटील, प्रा. कटकोळे, डॉ. सांभारे, प्रा. गोडबोले, प्रा. हरगणे, मेजर मोहन वीरकर, साळुंखे उपस्थित होते. आभार ऐश्वर्या पाटील हिने मानले. सूत्रसंचालन साक्षी कांबळे यांनी केले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत | सोमवार, २३ जानेवारी २०२३

# 'निंभार' कादंबरीचे प्रकाशन

प्रतिनिधी
इचलकरंजी

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उपक्रमांतर्गत तेजश्री प्रकाशनाचे शंभरावे पुस्तक संतोष तेंडुलकर लिखित निंभार कादंबरीचे प्रकाशन झाले. वाङ्मय मंडळाने आयोजित समारंभास कवी अरुण म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कवी म्हात्रे म्हणाले, साहित्य जिवंत माणसाच्या जगण्याचा दस्तऐवज आहे. साहित्यकृतीमधील जगण्याची अस्सल सल वाचकाच्या अंतरंगात उतरते तेव्हा ती जनमानसात रुजत जाते. निंभार ही अशीच कादंबरी असून भर उन्हात शीतल चांदणं शोषण्याचा प्रत्यय देणारी कृती आहे.

समीक्षक डॉ. रवींद्र ठाकूर म्हणाले, बोलणं ही माणसाची अभिव्यक्ती आहे तर लिहिणं ही लेखकाची अभिव्यक्ती आहे. कोणतेही साहित्य वाचनासाठी लिहिले जाते. अशी वाचनीय कादंबरी म्हणून निंभार उत्तम नमुना आहे. विशेष निमंत्रित कवी महेश केळुसकर, शशिकांत तिरोडकर, दिलीप सावंत यांनी निंभार लेखनाच्या प्रेरणा, लेखकाचे जीवन आणि त्यांच्या लेखन कौशल्याबद्दल गौरवोद्गार काढले.

प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी स्वागत केले. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे विश्वस्त राजन मुठाणे यांनी मनोगत व्यक्त केले. कादंबरीचे लेखक संतोष तेंडुलकर व कुटुंबीय आणि प्रकाशक दादासाहेब जगदाळे यांचा सत्कार झाला. प्रकाशन सोहळ्यात निमंत्रितांचे कविसंमेलन झाले. त्यात कवी अरुण म्हात्रे, महेश केळुसकर, शशिकांत तिरोडकर, दिलीप सावंत, रवींद्र ठाकूर,पाटलोबा पाटील, प्रकाश काशीद, वैशाली नायकवडे, वसंत पाटील, रोहित शिंगे व प्रियांका भाटले यांच्या कवितांना श्रोत्यांकडून उस्फूर्त दाद मिळाली. प्रास्ताविक प्रा. संजय सुतार यांनी केले. आभार डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. भारती कोळेकर यांनी केले. समारंभास प्रा. अशोक दास, इब्राहिम मिरजे, प्रसाद कुलकर्णी, सुषमा दातार, माया कुलकर्णी, प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनी रसिक उपस्थित होते.



इचलकरंजी : निंभार कादंबरी प्रकाशनप्रसंगी कवी अरुण म्हात्रे, डॉ. रवींद्र ठाकूर, संतोष तेंडुलकर, मान्यवर.

Scanned with CamScanner

लोकमत, सोमवार, दि. २३ जानेवारी २०२३

## प्रकाशन सोहळा

इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये 'निंभार' कादंबरीचा प्रकाशन सोहळा झाला. यावेळी कवी अरुण म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. सुरुवातीला प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी स्वागत व संजय सुतार यांनी प्रास्ताविक केले. यावेळी अशोक दास, इब्राहिम मिरजे, प्रसाद कुलकर्णी आदींसह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ , मंगळवार, २४ जानेवारी २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त भित्तीपत्रिका उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. अनिल पाटील आदी उपस्थित होते.

## 'डीकेएएससी'मध्ये भित्तीपत्रिकेचे उद्घाटन

इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये इतिहास विभागातर्फे नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली. बोस यांच्या प्रतिमेचे पूजन व भित्तीपत्रिकेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले. भित्तीपत्रिकेत दत्ताजीराव कदम, स्वामी विवेकानंद आणि नेताजी सुभाषचंद्र बोस जीवन वृत्तांत यांचा समावेश होता. निकिता हुबळी, ओंकार बेलेकर, सोहेब आरकाटे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. अरुण कटकोळे यांनी केले. आभार प्रा. विशाल गोडबोले यांनी मानले. डॉ. डी. सी. कांबळे, डॉ. सौ. वेल्हाळ, डॉ. उबाळे, डॉ. ज्ञानेश्वर कांबळे, प्रा. भारती कोळेकर आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ शनिवार, २८ जानेवारी २०२३

**डीकेएएससी कॉलेज**

प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्याहस्ते ध्वजवंदन झाले. सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी समूहगीत सादर केले. प्रा. मेजर मोहन वीरकर यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी पथकाने मानवंदना दिली.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत शनिवार, २८ जानेवारी २०२३

# इचलकरंजीत काव्यसंध्या २०२३ निमंत्रितांचे उद्या राज्यस्तरीय युवा कवी संमेलन

प्रतिनिधी
इचलकरंजी

सृजन सह्याद्री फौंडेशन, दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालय, प्रतिरंग प्रॉडक्शन, लोकराजा ऊर्जामैत्री – काव्यांगण परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने इचलकरंजीत प्रथमच "काव्यसंध्या २०२३ हे निमंत्रितांचे राज्यस्तरीय युवा कवी संमेलन रविवार २९ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता श्रीमंत ना. बा. घोरपडे नाट्यगृह येथे आयोजित केले आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. अनिल पाटील, संयोजक रोहित शिंगे, प्रतीक साठे, सारंग भांबुरे, सुनील दळवी यांनी पत्रकार परिषदेत दिली.



ग्वाल्हेर घराण्याचे गायक पंडित बाळकृष्ण बुवा यांचा संगीत वारसा लाभलेल्या इचलकरंजी शहरांमध्ये पहिल्यांदाच महाराष्ट्रातील नामवंत कवींच्या उपस्थितीत काव्यसंध्या २०२३ हे एक अविस्मरणीय कवीसंमेलन चे आयोजन करण्यात आले. या काव्यसंध्या २०२३ मध्ये अनंत राऊत (अकोला), रोहित शिंगे (इचलकरंजी), ध. सु. जाधव (हिंगोली), डॉ स्वप्निल चौधरी (सायगाव) विश्वास पाटील (राधानगरी), भैरवी चितळे (मुंबई), रमीजा जमादार (भुदरगड), अपूर्व राजपूत (सोयगाव) हे कवी विविध विषयांना स्पर्श करणाऱ्या कविता सादर करणार आहेत. लागिर झालं जी मधील कलाकार राहुल (राहुल मगदूम) यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या कवी संमेलनाचे उद्घाटन शहरातील प्रतिष्ठित व्यक्तींच्या उपस्थित होणार आहे. कार्यक्रमासाठी शहरातील अनेक व्यावसायिक, संस्था, प्राध्यापक, शिक्षक आणि नागरिकांनी सहकार्य केले आहे. तरी नागरिकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे आणि या काव्य मैफिलीचा आनंद घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे. पत्रकार परिषदेस प्रा. मेजर मोहन वीरकर, डॉ. डी. ए. यादव, प्रा. डॉ. डी. सी. कांबळे आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ मंगळवार, ३१ जानेवारी २०२३

## राज्यस्तरीय युवा कवी संमेलन; इचलकरंजीत रसिकांची दाद

# शब्दालंकारांनी रंगली काव्यमैफल

इचलकरंजी, ता. ३० : कशाला याचला चेहरा पुस्तके वाचणाऱ्याने, उभा रस्ता बदलला रे तिच्या एका इशाराने... मित्र यनव्यामध्ये गारव्यासारखा अशा अनेक कवितांनी वस्त्रनगरीची संध्याकाळ शब्दांच्या गोतावळ्यात रंगली. कवींनी एकापेक्षा एक दर्जेदार कविता सादर करत रसिकांची भरभरून दाद मिळवली. शब्दालंकारांनी भरलेली ही मैफल कवितेच्या सर्वच प्रकारांना स्पर्श करत उत्तरोत्तर रंगत गेली. वैविध्यपूर्णतेने नटलेल्या कवितांचा रसिकांनी अस्सल साहित्यानंद लुटला.



इचलकरंजी : येथे काव्यसंध्या कवी संमेलनात राज्यातील युवा निमंत्रित कवींनी कविता सादर केल्या.

सृजन सह्याद्री फौंडेशन, दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालय, प्रतिरंग प्रॉडक्शन, लोकराजा ऊर्जामैत्री - काव्यांगण परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथमच 'काव्यसंध्या' हे निमंत्रितांचे राज्यस्तरीय युवा कवी संमेलन श्रीमंत ना. बा. घोरपडे नाट्यगृहात झाले. अनंत राऊत (अकोला), रोहित शिंगे (इचलकरंजी), ध. सु. जाधव (हिंगोली), डॉ. स्वप्नील चौधरी (सायगाव), विश्वास पाटील (राधानगरी), भैरवी चितळे (मुंबई), रमीजा जमादार (भुदरगड), अपूर्व राजपूत (सोयगाव) यांनी कविता सादर केल्या. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन झाले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील, पोलिस अधिकारी महादेव वाघमोडे, विकास अडसूळ, मदन कारंडे, राजीव आवळे, राहुल खंजिरे, ॲड. सचिन माने, दशरथ माने, उदयसिंह पाटील, राजू आलासे, प्रमोद खुडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. स्वप्नील चौधरी यांच्या गण्या या बहारदार कवितेने काव्य संमेलनाला सुरुवात झाली. इचलकरंजीचे त्यांनी कवितेतून केलेल्या वर्णनाला रसिकांनी भरभरून दाद दिली. अपूर्व रजपूत यांच्यानंतर गझलेने गुलाबी हशा पिकवला. कवी अनंत राऊत यांच्या कशाला याचला चेहरा यांसारख्या कवितेने रसिकांना प्रेमाच्या दुनियेत नेले. भोंगा या कवितेतून राजकीय वर्तमानावर मार्मिक भाष्य केले. रमिजा जमादार यांचा मामाचा गाव आणि मुंबईच्या भैरवी चितळे यांच्या पाऊस या दोन्ही गेय कवितांनी मंत्रमुग्ध केले. विश्वास पाटील यांच्या शहर गझलेने कोरोना काळातील नात्यांमध्ये दुरावलेल्या गंभीर परिस्थितीवर भाष्य केले. हिंगोलीच्या ध. सु. जाधव यांनी बहारदार प्रेम कवितांनी रसिकांना हसवले.

कवी प्रा. रोहित शिंगे यांच्या सखी माहेरी आलेली या कवितेने रसिकांना प्रेम विश्वात नेले. प्रा. शिंगे यांनी निवेदनाने रसिकांना काव्यसंमेलनात खिळवून ठेवले. कवी राऊत यांच्या मैत्री या समारोपाच्या कवितेला रसिकांनी उभे राहून दाद दिली.

काव्य संमेलन यशस्वी करण्यासाठी पोलिस उपनिरीक्षक ओंकार काकडे, मेजर प्रा. मोहन विरकर, प्रतीक साठे, सारंग भांबुरे, विजयानंद लंबे, अंकुश पोळ, आविष्कार कांबळे, सुनील दळवी आदींनी परिश्रम घेतले.

### अन् बाल्कनी उघडावी लागली

■ राज्यातील युवा कवींचे काव्यसंमेलन हा कार्यक्रम शहरात पहिल्यांदाच प्रा. रोहित शिंगे यांच्या संकल्पनेतून आयोजित केला. काव्यसंमेलनाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. संमेलन सुरू होण्याआधीच नाट्यगृह भरले होते. गर्दी वाढल्याने कोरोनानंतर पहिल्यांदाच या कार्यक्रमाला बाल्कनी उघडावी लागली. बाल्कनी उघडूनही जागा अपुरी पडल्याने शेकडो रसिकांनी उभे राहूनच कवितांचा आनंद घेतला.

Scanned with CamScanner

दैनिक महासत्ता इचलकरंजी | मंगळवार, ता.३१ जानेवारी २०२३

# राज्यस्तरीय कवी संमेलनास रसिकांची भरभरून दाद

इचलकरंजी, ता.३०–

'कशाला वाचला चेहरा पुस्तके वाचणाऱ्याने, उभा रस्ता बदलला रे तिच्या एका इशाराने...', मित्र वनव्यामध्ये गारव्यासारखा अशा अनेक कवितांनी वस्त्रनगरीची संध्याकाळ शब्दांच्या गोतावळ्यात रंगली. निमंत्रित कवींनी एकापेक्षा एक दर्जेदार कविता सादर करत रसिकांची भरभरून दाद मिळवली. शब्दालंकारांनी भरलेली ही मैफल कवितेच्या सर्वच प्रकारांना स्पर्श करत उत्तरोत्तर रंगत गेली.

प्रा. रोहित शिंगे यांच्या संकल्पनेतून सृजन सह्याद्री फौंडेशन, दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालय, प्रतिरंग प्रॉडक्शन, लोकराजा ऊर्जामैत्री काव्यांगण परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथमच 'काव्यसंध्या' हे निमंत्रितांचे राज्यस्तरीय युवा कवी संमेलन श्रीमंत ना . बा . घोरपडे नाट्यगृहात पार पडले. अनंत राऊत (अकोला), रोहित शिंगे (इचलकरंजी), ध.सु.जाधव (हिंगोली), डॉ स्वप्निल



चौधरी (सायगाव) विश्वास पाटील (राधानगरी),भैरवी चितळे(मुंबई) रमीजा जमादार (भुदरगड),अपूर्व राजपूत (सोयगाव) यांनी कविता सादर केल्या.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन झाले. पोलीस निरिक्षक महादेव वाघमोडे, सपोनि विकास अडसूळ, मदन कारंडे, राजीव आवळे, राहुल खंजिरे, ॲड. सचिन माने, दशरथ माने, उदयसिंग पाटील, राजू आलासे, प्रमोद खुडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. स्वप्नील चौधरी यांच्या 'गण्या' या बहारदार कवितेने काव्य संमेलनाला सुरुवात झाली. अपूर्व रजपूत यांच्यानंतर 'नंतर नंतर' गझलेने गुलाबी हशा पिकवला. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी अनंत राऊत यांच्या 'कशाला वाचला चेहरा' यांसारख्या कवितेने रसिकांना प्रेमाच्या दुनियेत नेले. तर 'भोंगा' या कवितेतून राजकीय वर्तमानावर मार्मिक भाष्य केले. रमिजा जमादार यांचा 'मामाचा गाव' आणि मुंबईच्या भैरवी चितळे यांच्या 'पाऊस' या दोन्ही कवितांनी मंत्रमुग्ध केले. विश्वास पाटील यांच्या 'शहर गझलेने' कोरोना काळातील नात्यांमध्ये दुरावलेल्या गंभीर परिस्थितीवर भाष्य केले. हिंगोलीच्या ध. सु. जाधव यांनी आपल्या प्रेम कवितांनी रसिकांना हसवले. कवी प्रा. रोहित शिंगे यांच्या 'सखी माहेरी आलेली' या कवितेने रसिकांना प्रेम विश्वात नेले. कवी राऊत यांच्या 'मैत्री' या समारोपाच्या कवितेला रसिकांनी उभे राहून दाद दिली. काव्य संमेलन यशस्वी करण्यासाठी अरुण काशीद, मेजर प्रा. मोहन विरकर, प्रतीक साठे, सारंग भांबुरे, विजयानंद लंबे, अंकुश पोळ,दिग्विजय म्हामणे, अविष्कार कांबळे, सुनील दळवी आदींनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.अनिल पाटील यांनी केले. तर आभार पोलीस उपनिरीक्षक ओंकार काकडे यांनी मानले.

Scanned with CamScanner

तरुण भारत मंगळवार, ३१ जानेवारी २०२३

# भविष्यातील वैज्ञानिक उपक्रमातून निर्माण होतील

## कौस्तुभ गावडे : माणगांवातील सुवर्णमहोत्सवी विज्ञान प्रदर्शनाचा समारोप

वार्ताहर
रूकडी

विज्ञान प्रदर्शन उपक्रम हा चांगला असून अधिक विद्यार्थ्यांनी या मध्ये सहभागी व्हावे. भविष्यातील वैज्ञानिक या उपक्रमातून निर्माण होतील. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी – मोठे स्वप्न बघा– खूप मोठी स्वप्ने बघा मगच यशस्वी होऊ शकाल, असे मत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी व्यक्त केले.

माणगांव येथील ए. पी. मगदूम हायस्कूल मध्ये हातकणंगले तालुका सुवर्णमहोत्सवी विज्ञान प्रदर्शनाचा समारोपप्रसंगी ते बोलत होते. त्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

गट विकास अधीकारी शबाना मोकाशी म्हणाल्या, आपल्या तालुक्यातील विद्यार्थ्यांना विज्ञानाची आवड निर्माण व्हावी. ज्याला आवड आहे त्याला व्यासपीठ निर्माण व्हावे यासाठी विज्ञान प्रदर्शन हा उपक्रम राबविण्यात आला आहे. यावेळी ग्रामीण विज्ञान समितीची माहिती या पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सहभागी शाळांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी पाराशर हायस्कूलचे मुख्याध्यापक काटे, सागर चुडाप्पा, सचिन कोंडेकर, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे आजीव सेवक व शाखेचे निरीक्षक आर. ए. भोजकर, निर्भया पथक प्रमुख सीमा बडे, सुप्रिया बोंडे, उपसरपंच अख्तर भालदार, अमोल मगदूम, प्राथमिक शिक्षण अधिकारी उबाळे, शिक्षक नेते दादासाहेब लाड, मान्यवर उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक मुख्याध्यापिका एम. व्ही. कदम यांनी केले. सूत्रसंचालन भारती कोळी यांनी केले. आभार सचिन कोंडेकर यांनी मानले.

निकाल प्रथम क्रमांक : दिव्यांग विभाग प्रसाद जाधव पाराशर हायस्कूल पारगांव, प्रयोगशाळा सहाय्यक परीचर : आर.के. इंगळे पारगांव, प्राथमिक विद्यार्थी गट : बळवंतराव यादव हायस्कूल पेठवडगांव, माध्यमिक विद्यार्थी गट : शिवाजी इंगळे नरंदे, माध्यमिक शिक्षक गट : संदीप पोवार यळगूड.

CS Scanned with CamScanner

लोकमत | र, बुधवार, दि. १ फेब्रुवारी २०२३

# वस्त्रनगरीतील काव्यसंमेलनात युवा कवींनी विणले प्रेमाचे बंध

लोकमत न्यूज नेटवर्क

इचलकरंजी : कशाला वाचला चेहरा पुस्तके वाचणाऱ्याने, उभा रस्ता बदलला रे तिच्या एका इशाराने, मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा अशा अनेक कवितांनी वस्त्रनगरीची सायंकाळ शब्दांच्या गोतावळ्यात रंगली. निमंत्रित कवींनी एकापेक्षा एक दर्जेदार कविता सादर केल्या. शब्दालंकारांनी भरलेली ही मैफल कवितेच्या सर्वच प्रकारांना स्पर्श करत उत्तरोत्तर रंगत गेली.



इचलकरंजीत काव्यसंधी कवी संमेलनात अनंत राऊत यांनी कविता सादर केली. यावेळी रोहित शिंगे, धं. सु. जाधव, डॉ. स्वप्नील चौधरी, विश्वास पाटील, भैरवी चितळे, रमिजा जमादार, अपूर्व राजपूत उपस्थित होते.

शहरात प्रथमच 'काव्यसंध्या' हे निमंत्रितांचे राज्यस्तरीय युवा कवी संमेलन घोरपडे नाट्यगृहात पार पडले. अनंत राऊत (अकोला), रोहित शिंगे (इचलकरंजी), ध. सु. जाधव (हिंगोली), डॉ. स्वप्नील चौधरी (सायगाव), विश्वास पाटील (राधानगरी), भैरवी चितळे (मुंबई), रमिजा जमादार (भुदरगड), अपूर्व राजपूत (सोयगांव) यांनी कविता सादर केल्या.सुरुवातीला कौस्तुभ गावडे यांनी संमेलनाचे उद्घाटन केले. यावेळी पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे, विकास अडसूळ, मदन कारंडे, राहुल खंजिरे, ॲड. सचिन माने, दशरथ माने, राजू आलासे, आदी उपस्थित होते.

डॉ. स्वप्नील चौधरी यांच्या 'गण्या' या बहारदार 'कवितेने काव्य संमेलनाला सुरूवात झाली. अपूर्व राजपूत यांच्या 'नंतर नंतर' गझलने गुलाबी हशा पिकविला. अनंत राऊत यांच्या 'कशाला वाचला चेहरा' कवितेने रसिकांना प्रेमाच्या दुनियेत नेले.

रमिजा जमादार यांचा 'मामाचा गाव' आणि मुंबईच्या भैरवी चितळे यांच्या 'पाऊस' या दोन्ही कवितांनी मंत्रमुग्ध केले. विश्वास पाटील यांच्या 'शहर गझलेने' कोरोनाकाळातील नात्यामध्ये दुरावलेल्या गंभीर परिस्थितीवर भाष्य केले. रोहित शिंगे यांच्या 'सखी माहेरी आलेली' या कवितेने रसिकांना प्रेमविश्वात नेले.

Scanned with CamScanner

तरुण भारत बुधवार, १ फेब्रुवारी २०२३

# महाराष्ट्रातील युवा कवीने वस्त्रनगरीत विणले प्रेमाचे बंध

## प्रथमच आयोजन : राज्यातील आठ कवींची उपस्थिती

प्रतिनिधी
इचलकरंजी

कशाला वाचला चेहरा पुस्तके वाचणाऱ्याने, उभा रस्ता बदलला रे तिच्या एका इशाराने... मित्र वणव्यामध्ये गारव्यासारखा अशा अनेक कवितांनी वस्त्रनगरीची संध्याकाळ शब्दांच्या गोतावळ्यात रंगली. कवींनी एकापेक्षा एक दर्जेदार कविता सादर करत रसिकांची भरभरून दाद मिळवली. शब्दालंकारांनी भरलेली ही मैफल कवितेच्या सर्वच प्रकारांना स्पर्श करत उत्तरोत्तर रंगत गेली. मांडणाऱ्या वैविध्यपूर्णतेने नटलेल्या कवितांचा रसिकांनी अस्सल साहित्यानंद लुटला.

प्रा. रोहित शिंगे यांच्या संकल्पनेतून सृजन सह्याद्री फौंडेशन, दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालय, प्रतिरंग प्रॉडक्शन, लोकराजा ऊर्जामैत्री - काव्यांगण परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथमच काव्यसंध्या हे निमंत्रितांचे राज्यस्तरीय युवा कवी संमेलन श्रीमंत धोरपडे नाट्यगृहात पार पडले. अनंत राऊत (अकोला), रोहित शिंगे (इचलकरंजी), ध. सु. जाधव (हिंगोली), डॉ स्वप्निल चौधरी (सायगाव) विश्वास पाटील (राधानगरी), भैरवी चितळे (मुंबई) रमीजा जमादार (मुदरगड), अपूर्व राजपूत (सोयगाव) यांनी कविता सादर केल्या. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्या हस्ते व पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे, विकास अडसूळ, मदन कारंडे, राजीव आवळे, राहुल खंजिरे, अॅड. सचिन माने, दशरथ माने, उदयसिंह पाटील, राजू आलासे, प्रमोद खुडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



इचलकरंजी : येथे काव्यसंध्या या कवी संमेलनात कविता सादर करताना अनंत राऊत, व्यासपीठावर कवी रोहित शिंगे, ध. सु. जाधव, डॉ. स्वप्निल चौधरी, विश्वास पाटील, भैरवी चितळे, रमीजा जमादार, अपूर्व राजपूत.

डॉ. स्वप्नील चौधरी यांच्या गण्या या बहारदार कवितेने काव्य संमेलनाला सुरुवात झाली. अपूर्व रजपूत यांच्यानंतर गझलेने गुलाबी हशा पिकवला. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी अनंत राऊत यांच्या कशाला वाचला चेहरा यांसारख्या कवितेने रसिकांना प्रेमाच्या दुनियेत नेले. तसेच भोंगा या कवितेतून राजकीय वर्तमानावर मार्मिक भाष्य केले. रमिजा जमादार यांचा मामाचा गाव आणि मुंबईच्या भैरवी चितळे यांच्या पाऊस या दोन्ही गेय कवितांनी मंत्रमुग्ध केले. विश्वास पाटील यांच्या शहर गझलेने कोरोना काळातील नात्यांमध्ये दुरावलेल्या गंभीर परिस्थितीवर भाष्य केले. हिंगोलीच्या ध. सू. जाधव यांनी आपल्या बहारदार प्रेम कवितांनी रसिकांना हसवले. कवी प्रा. रोहित शिंगे यांच्या सखी माहेरी आलेली या कवितेने रसिकांना आपल्या प्रेम विश्वात घेऊन नेले. याबरोबर प्रा. शिंगे यांनी निवेदनाने रसिकांना संपूर्ण काव्यसंमेलनात खिळवून ठेवले. कवी राऊत यांच्या मैत्री या समारोपाच्या कवितेला रसिकांनी उभे राहून दिली.

काव्य संमेलन यशस्वी करण्यासाठी अरुण कांशीद, मेजर प्रा. मोहन बिरकर, प्रतीक साठे, सारंग भांबुरे, विजयानंद लंबे, अंकुश पोळ, दिग्विजय म्हामणे, अविष्कार कांबळे, सुनील दळवी आदींनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले. आभार पोलीस उपनिरीक्षक ओंकार काकडे यांनी मानले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत बुधवार दि. १ फेब्रुवारी २०२३

# डीकेएएसीमध्ये रोजगार वृद्धी, युवा आजीविका प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन

प्रतिनिधी
इचलकरंजी

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयातील इंग्रजी विभागाने आयोजित केलेल्या रोजगार वृद्धी आणि युवा आजीविका प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. या उपक्रमात महिला सक्षमीकरण आणि मुलींसाठी रोजगाराभिमुख कौशल्ये विकसित व्हावी, या उद्देशाने पदवीच्या अंतिम वर्षामधील मुलींसाठी ४० तासांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. नांदी फाउंडेशनच्या महिंद्रा प्राईड क्लासरूम प्रकल्पांतर्गत सुरू असलेल्या या प्रशिक्षणामध्ये ८० विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला आहे.



इचलकरंजी : डीकेएएसीमध्ये रोजगार वृद्धी, युवा आजीविका प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. अनिल पाटील, उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, प्रशिक्षिका आसावरी कुलकर्णी व मान्यवर.

उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे म्हणाले, स्त्रियांनी रोजगाराची अनेक क्षेत्रे पादाक्रांत केली असून विविध कौशल्यांच्या बळावर मुलींनी आपले वर्चस्व सिद्ध करत स्वावलंबनाबरोबरच राष्ट्र विकासाला चालना दिली पाहिजे.

महिंद्रा प्राईड क्लासरूमच्या प्रशिक्षिका आसावरी कुलकर्णी यांनी भाषिक कौशल्यांबरोबरच इतर कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत, असे नमूद केले. प्रास्ताविक इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. सुनिता वेल्हाळ यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. दीपक देवकर यांनी करून दिला. आभार प्रा. डॉ. प्रभा पाटील यांनी केले.

नियोजनासाठी प्रा. संदीप हरगाणे, प्रा. श्रद्धा बरगाले, प्रा. केशर धरनगुते यांनी सहयोग दिला. कार्यक्रमास मराठी विभागप्रमुख प्रा. संजय सुतार, प्राध्यापक, विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

Scanned with CamScanner

**पुण्यनगरी** बुधवार, १ फेब्रुवारी २०२३

# आकाश सस्ते याची निवड



**कुंभोज :** नेज शिवपुरी, ता. हातकणंगले येथील आकाश अरुण सस्ते याची इंडियन आर्मी टेक्निकल ट्रेडमध्ये निवड झाली. कोणतीही अकॅडमी न लावता हालाखीच्या परिस्थितीमध्ये जिद्दीच्या आणि प्रयत्नाच्या जोरावर त्याने हे यश मिळवले असून, गावातील मित्रांनी निवडीची बातमी ऐकताच फटाक्यांची आतषबाजी करत मिरवणूक काढण्यात आली. त्याच्या या निवडीने त्याच्यावर सामाजिक, शैक्षणिक व राजकीय स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

DKASC College

B.Sc III - 2022-23

CS Scanned with CamScanner

सकाळ
कोल्हापूर, शुक्रवार, ३ फेब्रुवारी २०२३

# डीकेएएससी महाविद्यालयाचे यश

▸ सकाळ वृत्तसेवा

इचलकरंजी, ता. २ : डीकेएएससी महाविद्यालयाने राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये यश मिळवले. पुणे बालेवाडी येथे झालेल्या शासकीय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये खेळाडूंनी विविध स्पर्धा प्रकारात यश संपादन केले. १९ वर्षांखालील उंच उडीमध्ये समीक्षा अडसुळे १.५० मीटर उंच उडी मारून राज्यात प्रथम क्रमांक मिळवला. सतरा वर्षांखालील गटात प्रतीक्षा अडसुळे १.४३ मीटर उंच उडी मारून प्रथम क्रमांक मिळवला.



इचलकरंजी : राज्यस्तरीय स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंचा डीकेएएससी महाविद्यालयाकडून ट्रॅक सूट व प्रमाणपत्र वितरण करून सत्कार केला.

थाळी फेक स्पर्धेत सौरभ दंडवते याने द्वितीय क्रमांक मिळविला. पुष्कर माळी याने ४१.३० मीटर थाळी फेकून द्वितीय क्रमांक मिळवला.

पालघर येथे झालेल्या राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत प्रथमेश खुळे याने ४४ किलो वजनी गटात तृतीय क्रमांक मिळवला. खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. खेळाडूंना प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्याहस्ते ट्रॅक सूट व प्रमाणपत्र वितरण करून कौतुक केले.

खेळाडूंचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभय कुमार साळुंखे, सचिव प्राचार्य डॉ. शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी अभिनंदन केले. खेळाडूंना प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत संवाद शुक्रवार, ३ फेब्रुवारी २०२३



इचलकरंजी : राज्यस्तरीय स्पर्धेतील यशस्वीतांच्या सत्कारप्रसंगी प्राचार्य अनिल पाटील व मार्गदर्शक.

# एएससी महाविद्यालयाचे राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये यश

इचलकरंजी : पुणे बालेवाडी येथे झालेल्या शासकीय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयातील खेळाडूंनी यश संपादन केले. १९ वर्षाखालील उंच उडीमध्ये समीक्षा अडसुळे १.५० मीटर उंच उडी मारून राज्यात प्रथम क्रमांक मिळवला. १७ वर्षाखालील गटामध्ये प्रतीक्षा अडसुळे १.४३ मीटर उंच उडी मारून प्रथम क्रमांक मिळविला. सौरभ दंडवते याने ४५.९२ मीटर हॅमर थ्रो फेकून द्वितीय क्रमांक मिळविला. पुष्कर माळी याने ४१.३० मीटर थाळी फेकून द्वितीय क्रमांक मिळवला. पालघर येथे झालेल्या राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेमध्ये प्रथमेश खुळे याने ४४ किलो वजन गटामध्ये तृतीय क्रमांक मिळवला. या सर्व खेळाडूंची नॅशनल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. खेळाडूंना प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते ट्रॅक सूट व सर्टिफिकेट वितरण करण्यात आले. खेळाडूंना संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्य डॉ. शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे सहकार्य लाभले. प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner



कोल्हापूर : राज्यस्तरीय अॅथलेटिक क्रीडा स्पर्धेमध्ये यश मिळविलेले दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयातील खेळाडू.

# एएससी महाविद्यालयाचे राज्य अॅथलेटिक स्पर्धेत यश

**केसरी वृत्तसेवा**

**कोल्हापूर :** पुणे बालेवाडी येथे झालेल्या शासकीय राज्यस्तरीय अॅथलेटिक क्रीडा स्पर्धेमध्ये दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयातील खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले.

१९ वर्षाखालील उंच उडी या स्पर्धेमध्ये समीक्षा अडसुळे १.५० मीटर उंच उडी मारून राज्यात प्रथम क्रमांक मिळवला. सतरा वर्षाखालील उंच उडी मध्ये प्रतीक्षा अडसुळे १.४३ मीटर उंच उडी मारून प्रथम क्रमांक मिळविला. सौरभ दंडवते याने हॅमर थ्रो मध्ये द्वितीय तसेच पुष्कर माळी याने थाळी फेकमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला. पालघर येथे झालेल्या राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेमध्ये प्रथमेश खुळे याने ४४ किलो वजन गटांमध्ये तृतीय क्रमांक मिळवला या सर्व खेळाडूंची नॅशनल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूंना प्राचार्य डॉ अनिल पाटील यांच्याहस्ते सर्टिफिकेट वितरण केले.

## प्रियकराचा प्रेयसीच्या घरासमोर धिंगाणा

**पुणे :** दीड वर्षांपासून असलेले प्रेमसंबंध तोडल्यानंतर, प्रेयसीने तीन दिवस अबोला धरल्याच्या कारणावरून चिडलेल्या प्रियकराने प्रेयसीच्या घरासमोर जाऊन धिंगाणा घातला. बोपोडी येथील भाऊ पाटील रस्त्यावरील एका उच्चभ्रू सोसायटीच्या खाली रविवारी रात्री हा प्रकार घडला. यावेळी प्रेयसी खाली येत नसल्यामुळे या प्रियकराने तिला मोठमोठ्याने शिवीगाळ केली.

केसरी

9921600800

3-2-2023

सकाळ कोल्हापूर, सोमवार, ६ फेब्रुवारी २०२३

# डीकेएएससी महाविद्यालयात रोजगार प्रशिक्षण वर्ग

इचलकरंजी, ता. ५ : स्त्रियांनी रोजगाराची अनेक क्षेत्रे पादाक्रांत केली आहेत. विविध कौशल्यांच्या बळावर मुलींनी वर्चस्व सिद्ध करत स्वावलंबनाबरोबरच राष्ट्र विकासाला चालना दिली पाहिजे, असे मत उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे यांनी व्यक्त केले.

येथील डीकेएएससी महाविद्यालयातील इंग्रजी विभागाने आयोजित केलेल्या रोजगार वृद्धी आणि युवा आजीविका प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महिला सक्षमीकरण आणि मुलींसाठी रोजगाराभिमुख कौशल्ये विकसित व्हावी या उद्देशाने प्रशिक्षण वर्ग झाला. पदवीच्या अंतिम वर्षामधील मुलींसाठी ४० तासांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. नांदी फाउंडेशनच्या महिंद्रा प्राइड क्लासरूम प्रकल्पांतर्गत सुरू असलेल्या प्रशिक्षणामध्ये ८० विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला आहे. महिंद्रा प्राइड क्लासरूमच्या प्रशिक्षिका आसावरी कुलकर्णी यांनी भाषिक कौशल्यांबरोबरच इतर कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत, असे सांगितले. प्रास्ताविक प्रा. डॉ. सुनीता वेल्हाळ यांनी केले.

CS Scanned with CamScanner

**तरुण भारत** सोमवार, ६ फेब्रुवारी २०२३

# उंच उडीत अनिकेत मानेची हॅट्ट्रिक



**कबनूर :** मध्यप्रदेश–भोपाळ येथे सुरू असलेल्या पाचव्या खेलो इंडिया स्पर्धेमध्ये कोल्हापूरच्या अनिकेत माने याने उंच उडी मध्ये कास्यपदक मिळवून मानाचा तुरा खोवला आहे. सलग तिसरया वर्षीही पदक मिळवून विजयाची हॅट्ट्रिक नोंदवली. अनिकेत हा सध्या बेंगलोर येथे साई स्पोर्ट्स सेंटरमध्ये ऑलिंपिकची खेळाडू सहाना कुमारी यांच्या मार्गदर्शनातील सराव करत आहे. कबनूर हायस्कूलचे क्रीडाशिक्षक सुभाष माने यांचा अनिकेत हा चिरंजीव आहे. दत्ताजीराव कदम आर्ट सायन्स कॉमर्स कॉलेज येथे बीएससी द्वितीय वर्षात शिकत आहे. त्याला कॉलेजचे प्राचार्य पाटील, मेजर विरकर व लेगीवाले यांचे प्रोत्साहन मिळाले. अनिकेत हा सोनी स्पोर्ट्स अकॅडमीचा खेळाडू आहे. यापूर्वी त्याने गुवाहाटी आसाम येथील स्पर्धेमध्ये उंच उडीत कांस्य पदक मिळविले होते. गतवर्षीच्या चंदीगड येथे झालेल्या स्पर्धेत सुवर्णपदक मिळविले होते.

Scanned with CamScanner

दैनिक महासत्ता सोमवार, ता.६ फेब्रुवारी २०२३

# अनिकेत माने याची खेलो इंडियात हॅट्ट्रिक

कबनूर,ता.५–

मध्य प्रदेश येथील भोपाळ या ठिकाणी सुरू असलेल्या पाचव्या खेलो इंडिया गेम्स मध्ये कोल्हापूरच्या अनिकेत माने यांनी उंच उडी मध्ये सलग तिसऱ्या वर्षी पदक प्राप्त केले. व विजयाची हॅट्रिक नोंदवली.



अनिकेत सध्या बेंगलोर या ठिकाणी साई स्पोर्ट्स सेंटरमध्ये ऑलिंपिकवी खेळाडू सहाना कुमारी तिच्या मार्गदर्शनावील सराव करतो.

कबनूर हायस्कूलचे क्रीडाशिक्षक सुभाष माने सर यांचा अनिकेत चिरंजीव होय. दत्ताजीराव कदम आर्ट सायन्स कॉमर्स कॉलेज इचलकरंजी या ठिकाणी बीएससी शिकत आहे.त्याला कॉलेजचे प्राचार्य श्री पाटील सर ,मेजर श्री विरकर सर व श्री लेगी वाले सर यांचे प्रोत्साहन मिळाले.अनिकेत हा सोनी स्पोर्ट्स अकॅडमी चा खेळाडू आहे.

मार्गदर्शक म्हणून पूजा शिंदे व त्याची बहीण उंच उडीची राष्ट्रीय सुवर्ण पदक विजेती खेळाडू स्फूर्ती माने यांचे त्याला वेळोवेळी मार्गदर्शन लाभते.

CS Scanned with CamScanner

पुण्यनगरी | बुधवार, ८ फेब्रुवारी २०२३



# प्रा. शुभांगी गावडे यांना 'क्रांतिज्योती' पुरस्कार

**कोल्हापूर :** येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेक्रेटरी, प्राचार्या शुभांगी मुरलीधर गावडे यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल सासवड (ता. पुरंदर) येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा समारंभ आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात सत्यशोधक समाज स्थापना शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त सत्यशोधक समाज परिषदेने आयोजित केला होता. अध्यक्षस्थानी खासदार सुप्रिया सुळे होत्या. पुरस्कार स्वीकारताना प्राचार्या शुभांगी गावडे म्हणाल्या, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने मिळालेला हा पुरस्कार माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांचा वसा व वारसा आणि प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे मार्गदर्शन घेऊन मी सध्या संस्थेची सेक्रेटरी म्हणून कार्यरत आहे. हा पुरस्कार माझा एकटीचा नसून संस्थेतील सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांचा बहुमान आहे.

CS Scanned with CamScanner

सकाळ | गुरुवार, ९ फेब्रुवारी २०२३

# सुयश चव्हाणचे जल्लोषी स्वागत

## दिल्लीत कर्तव्यपथावर संचलन; 'डीकेएएससी'तर्फे सत्कार

इचलकरंजी, ता. ८ : प्रजासत्ताकदिनी दिल्ली कर्तव्यपथावर संचलन केलेल्या डीकेएएससी महाविद्यालयाचा एनसीसी कॅडेट सुयश चव्हाण याचे शहरात जल्लोषी स्वागत केले. शिवतीर्थ चौकात महाविद्यालयातर्फे त्याचा सत्कार केला. महापालिकेचे आयुक्त सुधाकर देशमुख, प्रांताधिकारी डॉ. विकास खरात, प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवतीर्थ ते एएससी महाविद्यायात या प्रमुख मार्गावर त्याची मिरवणूक काढली.

सुयश याचा २६ जानेवारीला दिल्ली कर्तव्यपथावर झालेल्या संचलनात सहभाग होता. इचलकरंजी शहरासह महाविद्यालयाची बारा वर्षांची परंपरा त्याने कायम ठेवली.



**इचलकरंजी : दिल्ली कर्तव्यपथावर संचलन केलेल्या डीकेएएससी महाविद्यालयाचा एनसीसी कॅडेट सुयश चव्हाण याचा शिवतीर्थावर भव्य सत्कार करण्यात आला.**

प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत त्याचा भव्य सत्कार केला. उपस्थितांनी शिवतीर्थावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन केले. दिल्लीच्या कर्तव्यपथावर संचलन करणाऱ्या महाविद्यालयाच्या आतापर्यंतच्या सर्व एनसीसी कॅडेट्सचा सार्थ अभिमान आहे. हा अभिमान शहरासाठी नेहमीच प्रेरक राहील. इचलकरंजी शहराची ही कर्तव्यपथ संचलनाची परंपरा ही फार मोठी सन्मानाची बाब असल्याचे गौरवोद्गार आयुक्त श्री. देशमुख यांनी काढले. शिवतीर्थ चौकातून सजवलेल्या गाडीतून चव्हाण याच्या जल्लोषी मिरवणुकीला सुरुवात झाली. वाजत गाजत मुख्य मार्गावरून छत्रपती शाहू पुतळा मार्गे मिरवणूक एएससी महाविद्यालयापर्यंत पोहोचली. येथे महाविद्यालयात त्याचे स्वागत केले. रॅलीत मोठ्या संख्येने एनसीसी कॅडेट सहभागी झाले होते. एनएनसी विभागप्रमुख प्रा. मेजर मोहन विरकर यांनी महाविद्यालयाचा दिल्ली संचलनातील चढता आलेख स्वागत व प्रास्ताविकात मांडला. नगरसचिव विजय राजापुरे, दशरथ माने, पै. अमृत भोसले, प्रा. अर्जुन जाधव, प्रा. डी. ए. यादव, प्रा. मुजफ्फर लगोवाले, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. विशाल कांबळे, प्रा. हीतनाळे, सुयशचे वडील शिवाजी, आई सुनिता आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत गुरुवार, ९ फेब्रुवारी २०२३

# कर्तव्यपथावरील एनसीसी कॅडेटचे जल्लोषी स्वागत

प्रतिनिधी
इचलकरंजी

प्रजासत्ताक दिनी दिल्ली कर्तव्यपथावर संचलन केलेल्या डीकेएएससी महाविद्यालयाचा एनसीसी कॅडेट सुयश चव्हाण याचे शहरात जल्लोषी स्वागत करण्यात आले. शिवतीर्थ चौकात महाविद्यालयाच्यावतीने त्याचा सत्कार करण्यात आला. महापालिकेचे आयुक्त सुधाकर देशमुख, प्रांताधिकारी डॉ. विकास खरात, प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवतीर्थ ते एएससी महाविद्यालय या प्रमुख मार्गावर त्याची मिरवणूक काढण्यात आली.



इचलकरंजी : एनसीसी कॅडेट सुयश चव्हाण याच्या सत्कारावेळी आयुक्त सुधाकर देशमुख व मान्यवर.

सुयश चव्हाण याचा २६ जानेवारीला दिल्ली कर्तव्यपथावर झालेल्या संचलनात सहभाग होता. इचलकरंजी शहरासह महाविद्यालयाची बारा वर्षाची परंपरा त्याने कायम ठेवली. २०१२ पासून दरवर्षी दिल्ली परेडमध्ये सहभागी होणारे महाविद्यालय म्हणून डीकेएएससी महाविद्यालयाची ओळख बनली आहे. याचा अभिमान जपत एनसीसी कॅडेट चव्हाण याचे शहरात स्वागत करण्यात आले. उपस्थितांनी शिवतीर्थावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन केले. दिल्लीच्या कर्तव्यपथावर संचलन करणाऱ्या महाविद्यालयाच्या आतापर्यंतच्या सर्व एनसीसी कॅडेट्सचा सार्थ अभिमान आहे. हा अभिमान शहरासाठी नेहमीच प्रेरक राहील. इचलकरंजी शहराची ही कर्तव्यपथ संचलनाची परंपरा ही सन्मानाची बाब असल्याचे गौरवोद्गार आयुक्त देशमुख यांनी काढले. त्यानंतर शिवतीर्थ चौकातून गाडीतून चव्हाण याच्या जल्लोषी मिरवणुकीला सुरुवात झाली. वाजत गाजत मुख्य मार्गावरून छत्रपती शाहू पुतळा मार्गे मिरवणूक एएससी महाविद्यालयापर्यंत पोहोचली. याठिकाणी महाविद्यालयात त्याचे स्वागत करण्यात आले. रॅलीत मोठ्या संख्येने एनसीसी कॅडेट सहभागी झाले होते. एनएनसी विभागप्रमुख प्रा. मेजर मोहन विरकर यांनी महाविद्यायाचा दिल्ली संचलनातील चढता आलेख स्वागत व प्रास्ताविकेतून मांडला. यावेळी नगरसचिव विजय राजापुरे, दशरथ माने, पैलवान अमृत भोसले, प्रा. अर्जुन जाधव, प्रा. डी. ए. यादव, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. विशाल कांबळे, प्रा. हीतनाळे, सुयशचे वडील शिवाजी चव्हाण, आई सुनिता चव्हाण, प्रकाश जगताप आदी उपस्थित होते. आभार रोहित शिंगे यांनी मानले.

CS Scanned with CamScanner

सकाळ

# साहित्याच्या वाचनाने संस्कृतीचे आकलन

## निर्मिती सुतार; डीकेएएससी महाविद्यालयात व्याख्यान

इचलकरंजी, ता. १३ : जगभरातील असंख्य वास्तू या संस्कृती व सभ्यतेचा अमूल्य ठेवा आहेत. अशा वास्तूंचे संवर्धन म्हणजे, संस्कृतीचे जतन करणे आहे. संस्कृतीचा प्रभाव साहित्य व साहित्यातर कलांमध्ये प्रतिबिंबित होत असतो. साहित्याच्या वाचनाने संस्कृतीचे खरे आकलन होते. आता तरुण पिढीने ही जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असे विचार आंतरराष्ट्रीय वास्तुरचनाकार निर्मिती सुतार यांनी व्यक्त केले.

त्या इटली येथे जागतिक वास्तू संवर्धनाचे काम करतात. दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज येथे इंग्रजी विभाग व वाङ्मय मंडळ आयोजित 'कल्चर, लिटरेचर अँड आर्किटेक्चर' या विषयावरील भित्तीपत्रिका प्रकाशन व आयोजित व्याख्यानात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. इंग्रजी विभागातील डॉ. प्रभावती पाटील यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते.



**इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात आंतरराष्ट्रीय वास्तुरचना तज्ज्ञ निर्मिती सुतार यांचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी स्वागत केले.**

महाविद्यालयाच्या सकाळ सत्राचे प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे यांनी कोल्हापूर व भारतातील वारसा स्थळांचे सांस्कृतिक महत्त्व विशद केले. प्रा. संदीप हरगाणे, प्रा. दीपक देवकर व प्रा. श्रद्धा बरगाले यांच्या मार्गदर्शनाखाली कोमल ठोंगे, उर्मिला कांबळे, प्रमिला कांबळे, रेहान सय्यद यांनी कलात्मक पद्धतीने भित्तीपत्रिकांचे सादरीकरण केले.

यासाठी मराठी विभागप्रमुख प्रा. संजय सुतार, प्रा. भारती कोळेकर व डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांचे सहकार्य लाभले. यावेळी श्रीमती ए. आर. पी. कन्या महाविद्यालयातील इंग्रजी विभागाच्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

डॉ. अंजली उबाळे, प्रा. अरुण कटकोळे, डॉ. अनिल जांभळे, प्रा. व्ही. पी. पाटील आदी उपस्थित होते. इंग्रजी विभागप्रमुख डॉ. सुनीता वेल्हाळ यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. आभार सौ. केशर धरणगुत्ते यांनी मानले. अक्षता करड्याळकर, श्रेया मोळे यांनी सूत्रसंचालन केले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
14/02/2023 Page No. 2

महान कार्य
माघ कृ ८ अनुराधा
दि. १४ फेब्रुवारी २०२३



# तरूणांनो जबाबदारी स्विकारा

इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा.

जगभरातील असंख्य वास्तू या संस्कृती व सभ्यतेचा अमूल्य ठेवा आहेत.अशा वास्तूंचे संवर्धन म्हणजे, संस्कृतीचे जतन करणे ही जबाबदारी तरुण पिढीने स्वीकारली पाहिजे.संस्कृतीचा प्रभाव साहित्य व साहित्येतर कलांमध्ये प्रतिबिंबीत होत असतो.साहित्याच्या वाचनाने संस्कृतीचे खरे आकलन होते असे विचार आंतरराष्ट्रीय पातळीवर इटली येथे जागतिक वास्तू संवर्धनाचे काम करणाऱ्या वास्तूरचनाकार कु.निर्मिती सुतार यांनी व्यक्त केले. दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज येथे इंग्रजी विभाग व वाङ्मय मंडळ आयोजित 'कल्चर, लिटरेचर अँड आर्किटेक्चर' या विषयावरील भित्तीपत्रिका प्रकाशन व व्याख्यानाच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. सदर कार्यक्रमात प्रकाशित करण्यात आलेली भित्तीपत्रिका तयार करण्यासाठी इंग्रजी विभागातील प्रा.संदीप हरगाणे,प्रा.दीपक देवकर व प्रा.श्रद्धा बरगाले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कु. कोमल ठोंगे, कु. उर्मिला कांबळे, कु. प्रमिला कांबळे व रेहान सय्यद यांनी कलात्मक पद्धतीने भित्तिपत्रिका सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी मराठी विभाग प्रमुख व वाङ्मय विभाग प्रमुख प्रा. संजय सुतार यांचे सहकार्य लाभले कार्यक्रमासाठी श्रीमती ए. आर.पी. कन्या महाविद्यालय येथील इंग्रजी विभागातील प्रा. संदीप पाटील हे विद्यार्थिनींसह उपस्थित होते.नियोजनात मराठी विभागातील प्रा. भारती कोळेकर व डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांचे सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमासाठी डॉ. अंजली उबाळे, प्रा.अरुण कटकोळे, डॉ.अनिल जांभळे,प्रा. व्ही. पी.पाटील तसेच बहूसंख्येने विद्यार्थी,विद्यार्थिनी उपस्थित होते.आभार प्रदर्शन सौ. केशर धरणगुत्ते यांनी केले.भित्तिपत्रिकेत योगदान दिलेल्या विद्यार्थिनी कु. अक्षता करडयाळकर व कु. श्रेया मोळे यांनी सूत्रसंचालन केले.

Scanned with CamScanner

सकाळ

बुधवार, १५ फेब्रुवारी २०२३

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची निदर्शने

इचलकरंजी, ता. १४ : शहरातील विविध महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आज दुपारी २ ते २.३० दरम्यान आपापल्या महाविद्यालयात जोरदार निदर्शने केली. विद्यार्थी हित लक्षात घेऊन लवकरात लवकर प्रलंबित प्रश्नांबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा. तसेच रास्त मागण्यांची सोडवणूक करून आंदोलनाला पूर्णविराम द्यावा, अशी मागणी करण्यात आली.



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रलंबित मागण्यांसाठी निदर्शने केली.

सेवांतर्गत सुधारित आश्वासित प्रगती योजनेचा रद्द केलेले शासन निर्णय पुनर्जीवित करून पूर्ववत लागू करा, सातव्या वेतन आयोगातील तरतुदीनुसार लाभाची योजना विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करा, सातव्या वेतन आयोगापासून वंचित असलेल्या १४१० विद्यापीठीय शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करावा यासह मागण्या करण्यात आल्या आहेत. सर्व कर्मचारी आपापल्या महाविद्यालयाच्या गेटवर जमा झाले. मागण्या मान्य करण्यासाठी सर्वांनी घोषणा दिल्या. या मागण्यांबाबत लेखी आश्वासन मिळत नाही तोपर्यंत हे आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार सर्वांनी व्यक्त केला. आंदोलनाला शहरात सुटा संघटनेने पाठिंबा दिला. आंदोलनाच्या तिसऱ्या टप्प्यात बुधवारी (ता. १५) सर्व कर्मचारी काळ्या फिती लावून काम करणार आहेत.

CS Scanned with CamScanner

सकाळ, बुधवार, १५ फेब्रुवारी २०२३



घोसरवाड : डीकेएएससी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी येथील वृद्धाश्रमास भेट दिली.

# 'डीकेएएससी'च्या विद्यार्थ्यांची घोसरवाड येथील वृद्धाश्रमास भेट

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाच्या हिंदी विभागातील विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत घोसरवाड येथील वृद्धाश्रमास भेट दिली. या उपक्रमाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमाबद्दलची सर्व माहिती संयोजकांकडून जाणून घेतली. निराधार, एकाकी आजी-आजोबांबरोबर त्यांनी गप्पा मारल्या. त्यांना अल्पोपहार खाऊ घालत जीवनाश्यक साहित्य दिले. हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. अंजली उबाळे यांनी वृद्धाश्रमास भेट देण्यामागचा हेतू स्पष्ट केला. उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. मुझफ्फर लगीवाले, प्रशांत कांबळे उपस्थित होते. उपक्रमाचे संयोजन प्रा. अर्चना तराळ, प्रा. अपर्णा कांबळे, प्रा. किशोरी टोणपे यांनी केले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत बुधवार, १५ फेब्रुवारी २०२३

# साहित्य वाचनाने संस्कृतीचे खरे आकलन होते

## निर्मिती सुतार : डीकेएएससीमध्ये आंतरराष्ट्रीय वास्तू रचना तज्ज्ञांचे व्याख्यान

प्रतिनिधी
इचलकरंजी

जगभरातील असंख्य वास्तू या संस्कृती व सभ्यतेचा अमूल्य ठेवा आहेत. अशा वास्तुंचे संवर्धन म्हणजे, संस्कृतीचे जतन करणे ही जबाबदारी तरुण पिढीने स्वीकारली पाहिजे. संस्कृतीचा प्रभाव साहित्य व साहित्येतर कलांमध्ये प्रतिबिंबीत होत असतो. साहित्याच्या वाचनाने संस्कृतीचे खरे आकलन होते, असे विचार आंतरराष्ट्रीय पातळीवर इटली येथे जागतिक वास्तू संवर्धनाचे काम करणाऱ्या वास्तूरचनाकार निर्मिती सुतार यांनी व्यक्तकेले.



इचलकरंजी : वास्तूरचनाकार निर्मिती सुतार यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. अनिल पाटील व मान्यवर.

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज येथे इंग्रजी विभाग व वाङ्मय मंडळ आयोजित 'कल्चर, लिटरेचर अँड आर्किटेक्चर' यावरील भित्तीपत्रिका प्रकाशन व व्याख्यानावेळी त्या बोलत होत्या. डॉ. प्रभावती पाटील यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. डॉ. डी. सी. कांबळे यांनी कोल्हापूर व भारतातील वारसा स्थळांचे सांस्कृतिक महत्त्व विषद केले. डॉ. सुनिता वेल्हाळ यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. संदीप हरगाणे, प्रा. दीपक देवकर व प्रा. श्रद्धा बरगाले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कोमल ठोंगे, उर्मिला कांबळे, प्रमिला कांबळे व रेहान सय्यद यांनी कलात्मक पद्धतीने भित्तिपत्रिका सादरीकरण केले. नियोजन प्रा. संजय सुतार यांनी केले. कार्यक्रमासाठी श्रीमती ए. आर. पी. कन्या महाविद्यालय येथील इंग्रजी विभागातील प्रा. संदीप पाटील हे विद्यार्थिनींसह उपस्थित होते. नियोजनात मराठी विभागातील प्रा. भारती कोळेकर व डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांचे सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमासाठी डॉ. अंजली उबाळे, प्रा. अरुण कट्कोळे, डॉ. अनिल जांभळे, प्रा. व्ही. पी. पाटील उपस्थित होते. आभार केशर घरणगुते यांनी केले. अक्षता करडघाळकर व श्रेया मोळे यांनी सूत्रसंचालन केले.

Scanned with CamScanner

सकाळ मंगळवार, २१ फेब्रुवारी २०२३


इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सोमवारपासून बेमुदत संप पुकारला आहे.

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा संप सुरू

इचलकरंजी : विविध प्रलंबित मागण्यांसाठी शहरातील ४५ हून अधिक महाविद्यालयांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आजपासून संप पुकारला आहे. मागण्या मान्य होईपर्यंत बेमुदत संपावर जात आहेत.
उद्यापासून (ता. २१) बारावी बोर्डाच्या परीक्षा सुरू होत असल्याने कर्मचाऱ्यांविना परीक्षा घेताना महाविद्यालय प्रशासनाला तारेवरची कसरत करावी लागणार आहे. आश्वासित प्रगती योजना, ५८ महिन्यांची थकबाकी, १४१० कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करावा यांसह विविध मागण्यांसाठी हा संप पुकारला आहे. संपात शहरातील नाईट कॉलेज, डीकेएएससी महाविद्यालय, व्यंकटेश महाविद्यालय, कन्या कॉलेज, जयवंत महाविद्यालयातील कर्मचारी सहभागी झाले आहेत.

CS Scanned with CamScanner

सकाळ

## शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील १४ महाविद्यालये सहभागी

# इचलकरंजीत रोईंग, कयाकिंग स्पर्धा

इचलकरंजी, ता. २० : शहरात शिवाजी विद्यापीठाच्या आंतरविभागीय रोईंग, कनोईंग आणि कयाकिंग स्पर्धा झाल्या. येथील पंचगंगा नदीपात्रात झालेल्या स्पर्धेत विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील सांगली, सातारा आणि कोल्हापूर विभागांतून १४ महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला.

रोईंग प्रकारात ५०० मीटर व २००० मीटरमध्ये सिंगल स्कल, डबल स्कल, पेअर, डबल पेअर, तर कनोईंग आणि कयाकिंगमध्ये २०० मीटर, ५०० मीटर व १००० मीटरमध्ये सी- १, सी- २, सी- ४, तर के- १, के- २, के- ४ हे प्रकार घेण्यात आले. दत्ताजीराव कदम आर्ट, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्यावतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



**इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयातर्फे पंचगंगा नदीपात्रात आंतरविभागीय रोईंग, कनोईंग आणि कयाकिंग स्पर्धा झाल्या.**

प्रमुख पाहुणे म्हणून अमृतमामा भोसले उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन झाले. विद्यापीठ निवड समितीचे चेअरमन प्रा. तानाजी साबळे, सदस्य प्रा. आमीन बाणदार, सौ. वर्षा शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. समितीने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघाची निवड केली. स्पर्धा संयोजनासाठी वरद विनायक बोट क्लबचे संस्थापक गणेश बरगाले व विजय माळी यांचे सहकार्य लाभले.

स्पर्धेसाठी पंच म्हणून कृष्णा माने, कुमार मिठारी, करण घुणकी, कौस्तुभ पोकार्डे, साहील केसरकर, पवण कोळी, ओंकार दिवतणकर, अभिजित सासणे, संकेत पुजारी यांनी काम पाहिले. स्वागत व प्रास्ताविक जिमखाना विभागप्रमुख प्रा. मुजफ्फर लगीवाले यांनी केले. सूत्रसंचालन आदिती चिकोर्डे यांनी केले. आभार एनसीसी विभागप्रमुख प्रा. मेजर मोहन विरकर यांनी मानले. यावेळी प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. रॉड्रिक्स, प्रतीक कदम उपस्थित होते.

### स्पर्धेतील विजेते खेळाडू

- १००० मीटर : के १ -सूरज बिजले (महावीर कॉलेज कोल्हापूर), सी १ -कुमार मिठारी (नाईट कॉलेज, इचलकरंजी), सी १- प्रिया चव्हाण (डीकेएएससी कॉलेज, इचलकरंजी), सांघिक- के ४ - पवण कोळी, करण घुणकी, कौस्तुभ पोकार्डे व दर्शन पवार (डीकेएएससी कॉलेज, इचलकरंजी), सी ४ -साहील केसरकर, ओंकार दिवटणकर, सोमनाथ लगड, पृथ्वीराज पाटील (डीकेएएससी कॉलेज, इचलकरंजी), ५०० मीटर : के १ - श्रुती चौगुले, के २ - श्रुती चौगुले व आरती जाधव (शिवराज कॉलेज, गडहिंग्लज), सी १- संकेत इटाजपुजारी (एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड). २०० मी : के २ - निकिता पिष्टे (आजरा कॉलेज, आजरा), सी १ जयश खोत (शाहू कॉलेज, रुकडी), सी २ कृष्णा माने व अभिजित सासणे (भोगावती कॉलेज, भोगाव).

Kolhapur, Gadhinglaj-Today
21/02/2023 Page No. 4

सकाळ



**इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात सदिच्छा भेटप्रसंगी सत्यवान हाके यांचा प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी सत्कार केला.**

# पोलिस निरीक्षक सत्यवान हाके यांचा सत्कार

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाला पोलिस निरीक्षक सत्यवान हाके यांनी सदिच्छा भेट दिली. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी श्री. हाके यांचा सत्कार केला. श्री. हाके यांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात पोलिस निरीक्षक म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर प्रथमच महाविद्यालयास भेट दिली. प्राचार्य डॉ. पाटील यांनी महाविद्यालयाची माहिती दिली. उपप्राचार्य डी. सी. कांबळे, एनसीसी प्रमुख मेजर मोहन वीरकर, दशरथ माने, क्रीडाप्रमुख मुजफ्फर लगीवाले, प्रशांत कांबळे, व्यंकटेश माने आदी उपस्थित होते.

Kolhapur, Gadhinglaj-Today
21/02/2023 Page No. 4

सकाळ

र, बुधवार, २२ फेब्रुवारी २०२३

# प्रा. डॉ. सुभाष इंगळे यांची निवड



इचलकरंजी : दत्ताजीराव कदम आर्टस् अँड कॉमर्स महाविद्यालयाचे वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. सुभाष इंगळे यांची शिवाजी विद्यापीठ अभ्यास मंडळावर नियुक्ति झाली आहे. कुलगुरूंनी केलेल्या सदस्य नियुक्तिचे पत्र महाविद्यालयास प्राप्त झाले. प्रा. इंगळे डी.के.ए.एस.एसी महाविद्यालय अनेक वर्षे ज्ञानदानाचे कार्य करत असून त्यांनी रामलिंग, धुळोबा, बाबूजमाल, बाहुबली, नरंदे हिल्स येथील औषधी वनस्पतीचा अभ्यास केला आहे. त्यांच्या निवडीबद्दल स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभय साळुंखे, संस्था सचिव शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्रा. राजेंद्र शेजवळ, प्रा. अनिल पाटील यांनी अभिनंदन केले.

CS Scanned with CamScanner

सकाळ

# वाचन, मनन, चिंतनाने जग समजून घ्या

## अशोकराव माने; डीकेएएससी महाविद्यालयाचे श्रमसंस्कार शिबिर

इचलकरंजी, ता. २३ : वाचन, मनन, चिंतन करून जग समजावून घेतले तर स्वतःची ओळख होते. आजच्या स्पर्धेच्या युगात टिकायचे असेल तर विद्यार्थ्यांनी कार्यक्षमतेने, जिद्दीने, चिकाटीने विविध अंगभूत कौशल्यांचा विकास करणे आवश्यक आहे. श्रमसंस्कार शिबिरातूनच महान व्यक्तिमत्त्वे घडत असतात, असे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद सदस्य, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य अशोकराव माने यांनी केले.

डीकेएएससी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या सातदिवसीय शिबिराचे तिळवणी (ता. हातकणंगले ) येथे आयोजन केले आहे. तिळवणीचे सरपंच राजेश पाटील, उपसरपंच दीपक गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते.



**इचलकरंजी : राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना अशोकराव माने. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. अनिल पाटील, सरपंच राजेश पाटील, उपसरपंच दीपक गायकवाड आदी.**

प्राचार्य डॉ. पाटील म्हणाले, 'महाविद्यालयाने ग्रामीण भागात विशेष श्रमसंस्कार शिबिरे आयोजित करणे व श्रमदान करणे ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. शिबिरामुळे मुलांमध्ये विद्यार्थीदशेपासूनच श्रमाची प्रतिष्ठा निर्माण होण्यास मदत होते.' यावर्षी युवकांचा ध्यास, ग्राम - शहर विकास हा शिबिराचा मुख्य हेतू आहे. शिबिरात ग्रामस्वच्छता, निर्मलग्राम अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन, पर्यावरण संवर्धन, आपत्ती व्यवस्थापन, मतदान जनजागृती आदी उपक्रम घेतले जाणार आहेत.

कार्यक्रम अधिकारी प्रा. अरुण कटकोळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. पी. के. वाघमारे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डी. जे. मुंगारे यांनी आभार मानले. यावेळी प्रा. डी. ए. यादव, प्रा. ए. एन. साठे, प्रा. विशाल कांबळे, प्रा. एस. के. पाटील, प्रा. विशाल गोडबोले, डॉ. नवनाथ नाईकनवरे, प्रा. सचिन जाधव, प्रा. सौरभ मोरे, प्रकाश गिरी, सुनील कांबळे आदी उपस्थित होते.

Kolhapur, Gadhinglaj-Today
24/02/2023 Page No. 2

तरुण भारत संवाद
शुक्रवार, ३ मार्च २०२३

तरुण भारत संवाद

# डीकेएएससी कॉलेजची पोरं देशात भारी

## विद्यापीठ स्तरावरील राष्ट्रीय सांस्कृतिक स्पर्धेत चार विद्यार्थ्यांना सुवर्णपदक

प्रतिनिधी
इचलकरंजी

विद्यापीठ स्तरावरील राष्ट्रीय स्पर्धेत इचलकरंजीच्या डीकेएएससी कॉलेजची पोर देशात भारी ठरली आहेत. अखिल भारतीय विश्वविद्यालय राष्ट्रीय युवा महोत्सव स्पर्धा जैन युनिव्हर्सिटी बेंगलोर, कर्नाटक येथे झाल्या. राष्ट्रीय युवा महोत्सव स्पर्धामध्ये सांस्कृतिक दिंडी, आदिवासी लोकनृत्य यामध्ये डीकेएएससीच्या चार विद्यार्थ्यांचा सहभाग असलेल्या संघाने सुवर्ण पदक प्राप्त करून आपले वर्चस्व सिद्ध केले.

अलिकडच्या काळात कला आणि क्रीडा या क्षेत्राला प्रोत्साहन देणारे शहर म्हणून इचलकरंजीची ओळख निर्माण झाली आहे. खेळाच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरापर्यंत शहरातील



इचलकरंजी : राष्ट्रीय सांस्कृतिक स्पर्धेतील सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य डॉ. अनिल पाटील, प्राध्यापक, प्राध्यापिका व मान्यवर.

शेकडो विद्यार्थ्यांनी आपला डंका वाजवला आहे. या पाठोपाठ आता सांस्कृतिक क्षेत्रातील शहरातील युवा पिढी यशस्वी होऊ लागली आहे. राष्ट्रीय स्तरावर विद्यापीठ अंतर्गत विविध स्पर्धा होतात. यात महाराष्ट्राच्या संघातून विविध कलाप्रकारामध्ये शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या संघाने आपला सहभाग नोंदविला होता. सदर संघामध्ये डी. के. ए. एस. सी. महाविद्यालय, इचलकरंजीचे कु. महेश भाऊसाहेब गवंडी, तुषार वसंत पाटील, कु. स्वप्नील किरण जंत्रे व कु. यशराज पाटणकर हे विद्यार्थी विद्यापीठ संघामध्ये सहभागी होते. यापूर्वी या विद्यार्थ्यांनी गणपत युनिव्हर्सिटी, गुजरात येथे झालेल्या पश्चिम विभागीय राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये लोकनृत्य, मूकनाट्य, लोकसंगीत वाद्यवृंद, एकांकिका, लघुनाटिका इत्यादी कलाप्रकारात सहभाग नोंदवून यश संपादन केले होते. त्यानुषंगाने वरील सर्व विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय युवा महोत्सवामधील स्पर्धाकरिता विद्यापीठ संघात निवड झाली होती.

बेंगलोर येथे झालेल्या राष्ट्रीय युवा महोत्सव स्पर्धामध्ये सांस्कृतिक दिंडी, आदिवासी लोकनृत्य यामध्ये त्यांनी सुवर्ण पदक प्राप्त केले. तसेच लोकसंगीत वाद्यवृंद मध्ये कास्य पदक मिळविले. महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीमध्ये ही बाब गौरवास्पद आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या दैदिप्यमान यशाबद्दल महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव, सौ. शुभांगीताई गावडे यांचे यासाठी प्रोत्साहन मिळाले. विद्यार्थ्यांच्या या अतुलनीय कामगिरीबद्दल प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे, सदस्या सौ. डॉ. सुनिता वेल्हाळ, डॉ. पद्मश्री वाघमारे, डॉ. अर्जून जाधव व सौ. डॉ. रिता रॉड्रीक्स यांचे मार्गदर्शन मिळाले.

Scanned with CamScanner

तरुण भारत शुक्रवार, ३ मार्च २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात मराठी दिन कार्यक्रमात बोलताना कवयित्री नीलम माणगावे, समवेत प्राचार्य डॉ. अनिल पाटील व मान्यवर.

# 'कुसुमाग्रजांच्या साहित्यातून माणूस जोडण्याचे कार्य घडले'

प्रतिनिधी
इचलकरंजी

कुसुमाग्रज यांच्या साहित्यातून माणूस जोडण्याचे कार्य घडले, असे उद्गार ज्येष्ठ कवयित्री नीलम माणगावे काढले. येथील दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज येथे मराठी विभाग, वाङ्मय मंडळ आणि ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून त्या बोलत होत्या.

नीलम माणगावे म्हणाल्या, लढण्यासाठी आत्मबळ देणारी कुसुमाग्रज यांची कविता माणुसकीचे विलोभनीय दर्शन घडवते. त्याचबरोबर समाज, राष्ट्र यांच्या प्रती प्रेम, जिव्हाळा व आत्मीयतेचा संदर्भ मनात जागविण्याचे कार्य करीत सामाजिक बांधिलकीचे आत्मभान देणाऱ्या कवी कुसुमाग्रज यांच्या साहित्यातून माणूस जोडण्याचे कार्य घडले. आपल्या ओघवत्या भाषणातून त्यांनी वर्तमान समाजाच्या स्थितीगतीवर भाष्य केले. कार्यक्रमाच्या निमित्ताने अक्षरदिव्य प्रकाशन यांच्यावतीने महाविद्यालय प्रांगणात आयोजित ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते झाले. प्राचार्य डॉ. पाटील, म्हणाले, मराठी भाषेतील विपुल लेखन हे मानवी जीवन समृद्ध करणारे आहे म्हणून विद्यार्थ्यांनी सतत वाचत राहावे. यावेळी अक्षरदिव्य प्रकाशनचे दादासाहेब जगदाळे यांचा सत्कार करण्यात आला. प्रियांका माटले हिने कुसुमाग्रज यांच्या कवितेमधून सामाजिक जाणिवांचे भावविश्व उलगडून दाखविले. याप्रसंगी महाविद्यालयातील दुपार सत्राचे प्रमुख प्रा. डी. ए. यादव यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे संयोजन वाङ्मय मंडळाचे प्रमुख प्रा. संजय सुतार, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. सुनिता वेल्हाळ, हिंदी विभाग प्रमुख डॉ. अंजली उबाळे व ग्रंथपाल प्रा. विजय यादव यांनी केले.

कार्यक्रमास प्रा. डॉ. डी. जी. धोडके, डॉ. प्रभावती पाटील, प्रा. अनिता चौधरी, प्रा. रोहित शिंगे, फराडे, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, पुस्तक प्रेमी ग्रुप, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांनी केले. आभार प्रा. भारती कोळेकर यांनी मानले. सूत्रसंचालन संजीवनी कदम यांनी केले.

Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र

**केसरी**

# राष्ट्रीय युवा महोत्सव स्पर्धेमध्ये डी.के.ए.एस.सी. कॉलेजचे यश

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी** : अखिल भारतीय विश्वविद्यालय राष्ट्रीय युवा महोत्सव स्पर्धा जैन युनिव्हर्सिटी बेंगलोर, कर्नाटक राज्य येथे संपन्न झाल्या. या स्पर्धांमधील विविध कलाप्रकारामध्ये शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या संघाने आपला सहभाग नोंदविला होता. सदर संघामध्ये डी.के.ए.एस.सी. महाविद्यालय, इचलकरंजीचे महेश भाऊसाहेब गवंडी, तुषार वसंत पाटील, स्वप्नील किरण जंत्रे व यशराज पाटणकर हे विद्यार्थी विद्यापीठ संघामध्ये सहभागी होते.



**इचलकरंजी : बेंगलोर येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय युवा महोत्सव स्पर्धेमध्ये डी.के.ए.एस.सी. कॉलेजने मोठे यश संपादन केले.**

यापूर्वी या विद्यार्थ्यांनी गणपत युनिव्हर्सिटी, गुजरात येथे झालेल्या पश्चिम विभागीय राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये लोकनृत्य, मूकनाट्य, लोकसंगीत वाद्यवृंद, एकांकिका, लघुनाटिका इत्यादी कलाप्रकारात यश संपादन केले होते.

राष्ट्रीय युवा महोत्सव स्पर्धांमध्ये सांस्कृतिक दिंडी, आदिवासी लोकनृत्य यामध्ये त्यांनी सुवर्ण तसेच लोकसंगीत वाद्यवृंदमध्ये कास्यपदक मिळविले.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव, शुभांगीताई गावडे यांचे त्यांना प्रोत्साहन मिळाले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच डॉ. डी. सी. कांबळे, डॉ. सुनिता वेल्हाळ, डॉ. पद्मश्री वाघमारे, डॉ. अर्जून जाधव व डॉ. रिता रॉड्रीक्स यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

दक्षिण महाराष्ट्र

केसरी

9921600800

3-3-2023

सकाळ कोल्हापूर, शनिवार, ४ मार्च २०२३

# राष्ट्रीय स्पर्धेत डीकेएएससी महाविद्यालयाचे वर्चस्व

## विद्यापीठस्तरीय सांस्कृतिक दिंडी, आदिवासी लोकनृत्यात देशात ठरले भारी

इचलकरंजी, ता. ३ : विद्यापीठस्तरीय राष्ट्रीय सांस्कृतिक स्पर्धेत येथील दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजचे चार विद्यार्थी देशात भारी ठरले आहेत. स्पर्धेत सांस्कृतिक दिंडी, आदिवासी लोकनृत्य कलाप्रकारात या चार विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन शिवाजी विद्यापीठाला सुवर्णपदक प्राप्त करून दिले. विद्यापीठासह राष्ट्रीय स्पर्धेत डीकेएएससी महाविद्यालयाने वर्चस्व ठेवले. अखिल भारतीय विश्वविद्यालय या राष्ट्रीय युवा महोत्सव स्पर्धा जैन युनिव्हर्सिटी बेंगलोर (कर्नाटक) येथे झाल्या.

विद्यापीठांतर्गत राष्ट्रीय स्तरावर विविध सांस्कृतिक स्पर्धा घेतल्या जातात. स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाचा नेहमी अग्रेसर सहभाग असतो. बेंगलोर येथे आयोजित राष्ट्रीय युवा महोत्सव सांस्कृतिक स्पर्धेत महाविद्यालयाचे महेश गवंडी, तुषार पाटील, स्वप्नील अत्रे, यशराज पाटणकर हे विद्यार्थी सहभागी झाले होते. यापूर्वी विद्यार्थ्यांनी गणपत युनिव्हर्सिटी, गुजरात येथे झालेल्या पश्चिम विभागीय राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये लोकनृत्य, मूकनाट्य, लोकसंगीत वाद्यवृंद, एकांकिका, लघुनाटिका आदी कलाप्रकारात सहभाग नोंदवून यश संपादन केले होते. विद्यार्थ्यांची राष्ट्रीय युवा महोत्सवामधील स्पर्धांसाठी विद्यापीठ संघात निवड झाली होती.



इचलकरंजी : राष्ट्रीय सांस्कृतिक स्पर्धेत सुवर्णपदकप्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार डीकेएएससी महाविद्यालयातर्फे करण्यात आला.

बेंगलोर येथे सांस्कृतिक दिंडी, आदिवासी लोकनृत्य कलाप्रकारात त्यांनी विद्यापीठ संघाला सुवर्णपदक प्राप्त करून दिले. लोकसंगीत वाद्यवृंदमध्ये कास्यपदक मिळवले. महाविद्यालयासह शहराच्या सांस्कृतिक परंपरेला ही बाब अभिमानास्पद अशी आहे. विद्यार्थ्यांचा अतुलनीय कामगिरीबद्दल प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे सहकार्य लाभले. सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. डी. सी. कांबळे, सदस्या डॉ. सुनीता वेल्हाळ, डॉ. पद्मश्री वाघमारे, डॉ. अर्जुन जाधव, डॉ. रिता रॉड्रिक्स यांचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र

**केसरी** ८ मार्च २०२३/५



इचलकरंजी : दत्ताजीराव कदम कॉलेज येथे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजीत कार्यक्रमात बोलताना नीलम माणगावे.

# कुसुमाग्रज यांच्या साहित्यातून माणूस जोडण्याचे कार्य घडले

**– नीलम माणगावे**

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** लढण्यासाठी आत्मबळ देणारी कुसुमाग्रज यांची कविता माणुसकीचे विलोभनीय दर्शन घडवते. त्याचबरोबर जिव्हाळा व आत्मीयतेचा संदर्भ मनात जागविण्याचे कार्य करीत सामाजिक बांधिलकीचे आत्मभान देणाऱ्या कवी कुसुमाग्रज यांच्या साहित्यातून माणूस जोडण्याचे कार्य घडले, असे प्रतिपादन ज्येष्ठ कवयित्री नीलम माणगावे यांनी केले. येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज येथे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजीत कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी अक्षरविश्व प्रकाशनाचे दादासाहेब जगदाळे यांचा सत्कार केला. याप्रसंगी प्रियांका भाटले या विद्यार्थीनीने मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रा. डी.ए. यादव उपस्थित होते.या समारंभास डॉ. डी. जी. घोडके, डॉ.प्रभावती पाटील, प्रा.अनिता चौधरी, प्रा.रोहित शिंगे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. ज्ञानेश्वर कांबळे, आभार प्रा. भारती कोळेकर, सूत्रसंचालन संजीवनी कदम यांनी केले.

Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, सोमवार, १३ मार्च २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात पर्यावरणपूरक रंगप्रदर्शनाचे आयोजन केले होते.

# 'डीकेएएससी'त पर्यावरणपूरक रंगप्रदर्शन

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात पर्यावरणपूरक रंगप्रदर्शनाचे आयोजन केले होते. वनस्पतीशास्त्र विभागातर्फे आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध फुलांपासून नैसर्गिक रंग तयार करून त्याची मांडणी केली. नैसर्गिक रंग हे मानवास हानीकारक नसतात. त्यामुळे जास्वंद, गुलाब, पालक, झेंडू, जांभूळ, हळद, बीट, गोकर्ण आदी वनस्पतीपासून विद्यार्थ्यांनी रंग तयार केले. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे होते. विभाग प्रमुख एस. टी. इंगळे यांनी विद्यार्थ्यांना नैसर्गिक रंगाची माहिती दिली. सूत्रसंचालन डॉ. मधुमती शिंदे यांनी केले. आभार डॉ. संदीप गावडे यांनी मानले. प्रा. भारती डोपारे, डॉ. आम्रपाली कट्टी, प्रा. उर्मिला चौगुले, डॉ. वर्षा दवंडे आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ कोल्हापूर, मंगळवार, १४ मार्च २०२३



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात इंग्रजी विभाग व ग्रंथालय यांच्यातर्फे लेखिका ग्रंथप्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना डीकेटीई सोसायटीच्या मानद सचिव डॉ. सपना आवाडे आदी.

## 'डीकेएएससी'मध्ये लेखिका ग्रंथप्रदर्शन

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात इंग्रजी विभाग व ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने महिला लेखिका ग्रंथांचे प्रदर्शन भरविण्यात आले. डीकेटीई सोसायटीच्या मानद सचिव डॉ. सपना आवाडे यांच्या हस्ते याचे उद्‌घाटन झाले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. सुनीता वेल्हाळ, हिंदी विभागप्रमुख डॉ. अंजली उबाळे उपस्थित होते. महिला लेखिका ग्रंथप्रदर्शन उपक्रमाचे कौतुक केले. प्रा. डॉ. डी. जी. घोडके, डॉ. प्रभावती पाटील, ग्रंथपाल व्ही. पी. यादव आदी उपस्थित होते. प्रा. दीपक देवकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. संदीप हरगाणे यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner

कोल्हापूर, शुक्रवार, १७ मार्च २०२३

सकाळ

# डीकेएएससी महाविद्यालयात कार्यशाळा

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात बौद्धिक संपदा अधिकार या विषयावर कार्यशाळा झाली. राष्ट्रीय संपदा मिशनच्या अनुषंगाने महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता कक्ष, संशोधन चालना आणि देखरेख कक्ष व बौद्धिक संपदा अधिकार कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा झाली. प्रमुख पाहुण्या म्हणून पेटंट्स डिझाईन्स, पेटंट कार्यालय मुंबईच्या परीक्षक विनोदिनी चरण यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी बौद्धिक संपदा अधिकार प्राप्त करणे का महत्त्वाचे आहे आणि त्याची प्रक्रिया यासंबंधी उदाहरणांसह माहिती दिली. ऑनलाईन पद्धतीने आयोजित व्याख्यानाला विद्यार्थी व प्राध्यापकांचा प्रतिसाद मिळाला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. नियोजन बौद्धिक संपदा अधिकार कक्षप्रमुख डॉ. सुनीता वेल्हाळ यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. अनिता घारे यांनी करून दिली. अंतर्गत गुणवत्ता कक्षप्रमुख डॉ. विनायक गणबावले यांनी आभार मानले. तांत्रिक सहकार्य प्रा. अक्षय स्वामी व डॉ. दीपक कुंभार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संदीप हरगाणे यांनी केले.

CS Scanned with CamScanner

सकाळ



**इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्षानिमित्त भित्तिपत्रिका प्रदर्शन आयोजित केले.**

## ‘डीकेएएससी’मध्ये भरड धान्य वर्ष

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष साजरे झाले. यानिमित्त वनस्पतिशास्त्र विभागाने भरड धान्य आणि त्याचे आहारातील महत्त्व समजावून सांगण्याच्या उद्देशाने भित्तिपत्रिका प्रदर्शन व व्याख्यान आयोजित केले. प्रा. डी. ए. यादव यांनी मनोगत व्यक्त केले. गणित विभागप्रमुख प्रा. मुंगारे, प्रा. डॉ. सुतार आणि भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. गाणबावले यांची प्रमुख उपस्थिती होती. वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. टी. इंगळे यांनी बदलती जीवनशैली, त्याचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम आणि भरड धान्याचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. आम्रपाली कट्टी यांनी सूत्रसंचालन केले. पौर्णिमा पाटील हिने आभार मानले. प्रा. भारती दोपारे, डॉ. मधुमती शिंदे, डॉ. लीना खाडे, डॉ. संदीप गावडे, प्रा. आरती खोत, प्रा. ऊर्मिला चौगुले आणि डॉ. उदयसिंह देसाई आदी उपस्थित होते.

Kolhapur, Ichalkaranji-Today
20/03/2023 Page No. 2

सकाळ

# 'डीकेएएससी'च्या खेळाडूंची निवड

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयाच्या खेळाडूंची शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली. पंजाब युनिव्हर्सिटी (पतियाला) येथे होणाऱ्या ऑल इंडिया आंतरविद्यापीठ कयाकिंग व कनोईंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. पुरुष संघात करण घुणके, पवन कोळी, कौस्तुभ पोकार्डे, दर्शन पवार, तसेच महिला संघात पिया चव्हाण यांचा समावेश आहे. शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धेत वरील खेळाडूंनी कयाकिंग आणि कनोईंग सर्धेत के-१, के-२ व सी -१, सी- २ या प्रकारात यश मिळवले. खेळाडूंचा प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्याहस्ते सत्कार केला. जिमखाना विभागप्रमुख प्रा. मेजर एम. जे. वीरकर, प्रा. मुझफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे आदींचे मार्गदर्शन लाभले.

Kolhapur, Ichalkaranji-Today
20/03/2023 Page No. 2

तरुण भारत
बुधवार, २२ मार्च २०२३

# डीकेएएससीमध्ये प्राणीशास्त्र विभागातर्फे ऑनलाईन चिमणी गणना

**इचलकरंजी :** डीकेएएससीमध्ये प्राणीशास्त्र विभागांतर्गत जागतिक चिमणी दिन साजरा करण्यात आला. या अंतर्गत निसर्गमित्र जळगावतर्फे तीन दिवस महाराष्ट्र व्यापी ऑनलाईन चिमणी गणना घेतली. या गणनेत सहभाग घेतलेल्या विद्यार्थी व निसर्गप्रेमींना प्रमाणपत्र ही देण्यात आले. चिमणीगणनेसाठी तीन दिवसातील आपल्या सोयीचा एक दिवस निवडून त्या दिवशी सकाळी ६.३० ते ९.३० अथवा संध्याकाळी ४.३० ते ६.३० या वेळात किमान १५ मिनिट किंवा त्यापेक्षा जास्त वेळ गणना करावयाची होती. या मोहिमेला पक्षीमित्र शिल्पा व राजेंद्र गाडगीळ निसर्गमित्र जळगाव यांचे मार्गदर्शन मिळाले. नागरिकांनी चिमणी गणनेची पोस्ट सर्वत्र पाठवून चिमणी वाचवा मोहिमेत सहभाग घ्यावयाचा होता. चिमण्या का नाहीशा होत आहेत, त्याची कारणे कोणती आणि चिमणी वाचवण्याचे, जतनाचे व संवर्धनाचे मार्ग व उपाय कोणते आहेत ते सर्व नागरिकांपर्यंत समजणे हा उद्देश आजच्या कार्यक्रमाचा होता. चिमणी बचाव मोहिमेत सहभागी होणे व समस्येवर निराकरण करणे काळाची गरज आहे असे म्हणले तर वावगे ठरणार नाही. सोबत चिमणी गणनेची लिंक देत दिली होती, त्यामध्ये किती संख्या चिमणीचे आहेत ती संख्या लिहावयाची होती. प्राणीशास्त्र विभागांतर्गत ही मोहिम पंचगगा नदी वरदविनायक मंदीर या परिसरात घेतली. प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. के. वाघमारे यांनी नियोजन केले. या मोहिमेत डॉ. रेश्मा सनदी व बीएस्सी ३ च्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

CS Scanned with CamScanner

महान कार्य | चैत्र शु. २ रेवती | दि. २३ मार्च २०२३

# डीकेएएससी महाविद्यालयात भरड धान्य वर्ष साजरे

इचलकरंजी / महान कार्य वृत्तसेवा

डीकेएएससी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष साजरे केले. यानिमित्त वनस्पतिशास्त्र विभागाने भरड धान्य आणि त्याचे आहारातील महत्त्व समजावून सांगण्याच्या उद्देशाने भित्तिपत्रिका प्रदर्शन व व्याख्यान आयोजित केले.

प्रा. डी. ए. यादव यांनी मनोगत व्यक्त केले. गणित विभागप्रमुख प्रा. मुंगारे, प्रा. डॉ. सुतार आणि भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. गाणबावले यांची प्रमुख उपस्थिती होती. वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. टी. इंगळे यांनी बदलती जीवनशैली, त्याचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम आणि भरड धान्याचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. आम्रपाली कट्टी यांनी सूत्रसंचालन केले.

पौर्णिमा पाटील हिने आभार मानले. प्रा. भारती दोपारे, डॉ. मधुमती शिंदे, डॉ. लीना खाडे, डॉ. संदीप गावडे, प्रा. आरती खोत, प्रा. ऊर्मिला चौगुले आणि डॉ. उदयसिंह देसाई आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

महान कार्य | चैत्र शु. ३ अश्विन
दि. २४ मार्च २०२३

# 'डीकेएएससी'च्या खेळाडूंची निवड

इचलकरंजी /महान कार्य वृत्तसेवा

डीकेएएससी महाविद्यालयाच्या खेळाडूंची शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली. पंजाब युनिव्हर्सिटी (परियाला) येथे होणाऱ्या ऑल इंडिया आंतरविद्यापीठ कयाकिंग व कनोईंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे.

पुरुष संघात करण घुणके, पवन कोळी, कौस्तुभ पोकार्डे, दर्शन पवार, तसेच महिला संघात पिया चव्हाण यांचा समावेश आहे. शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धेत वरील खेळाडूंनी कयाकिंग आणि कनोईंग सर्धेत के-१, के-२ व सी -१, सी- २ या प्रकारात यश मिळवले. खेळाडूंचा प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्याहस्ते सत्कार केला. जिमखाना विभागप्रमुख प्रा. मेजर एम. जे. वीरकर, प्रा. मुझफ्फर लगीवाले, प्रा. प्रशांत कांबळे आदींचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner